अ।न।४८

D25

ऊ ७८०

इतिहासोपदेशशतक

कवि - सदाशिव भैरेश्वर किडे

श्री

इतिहासोपदेशशतक.

हें

काव्य

सदाशिव मोरेश्वर भिडे

स्कू. मास्तर गगन बावडा

यांनीं केलें

तें

कुरुंदवाड येथें

भाऊनाना प्रेस मध्यें छापिलें

तारीख १० नोवेंबरसन १८९७ इ.

किंमत चार आणे.

प्रस्तावन

श्रीमंत राजश्री.

गणपतराव हरिहर उर्फ बापूसाहेब पटवर्धन ऐति-

वेचन

सरकार हे

संस्थान कुरुंदवाड

यांस

हें काव्य.

त्यांचें कवित्व, विद्याप्रियत्व इत्यादि

अनेक गुणांस लुब्ध होऊन

त्यांच्या परवानगीनें मी

सादर अर्पण करितों

गीति.

दारिद्र्यशीतभीतां सुखकर वित्तस्वरूप पट वीतीं ॥
पटवीती पटवर्धन स्वनाम, अन्वर्थ वंश नटवीती ॥

सेवक

सदाशिव मोरेश्वर भिडे.

ह तो
च्या विद्या-
ला आहे याचा

प्रस्तावना.

इतिहास हा सर्व शास्त्रांचा जनक आहे. कोणत्याही विषयाची ऐतिहासिक पद्धतीनें उपपत्ति बसविल्याशिवाय त्याविषयाचें शास्त्रीय विवेचन झालें असें मानीत नाहींत. या वरून इतिहासाची आवश्यकता किती आहे तें स्पष्ट होतें. त्यांत ही मनुष्याच्या वर्तनाचा इतिहास हा इतर कोणत्याही इतिहासापेक्षां अधिक महत्वाचा असल्यानें त्यावर लहान मोठे अनेक ग्रंथ झाले व होत आहेत. व तो शाळांतून शिकविण्याची रीत आहे. प्रत्येक मनुष्याचें वर्तन नीतीचें असावें या करितां नीति शास्त्राची जरूर आहे, आणि नीतिशास्त्रास सर्वथा इतिहासाचा आधार आहे. हरएक नीतीच्या प्रमेयास इतिहासांतलीं उदाहरणें दिलीं असतां त्या त्या नीतिविषयाचा ठसा मनावर चांगला उठतो.

लहान मुलांस नीतिज्ञान प्राप्त व्हावें ह्मणून इसापनीति किंवा पंचतंत्र यांच्या धर्तीवर अगर " नऊरत्नें " या पुस्तकाच्या पद्धतीवर ग्रंथ झाले आहेत. परंतु त्यांतील गोष्टी काल्पनिक असल्यानें त्यां पासून जो ठसा उठतो तो खऱ्या गोष्टीं पासून उठणाऱ्या ठशापेक्षां कमी योग्यतेचा आहे हें उघड आहे.

आतां इतर देशाच्या इतिहासापेक्षां आपल्याच देशाचा इतिहास हा ह्या संबंधानें विशेष उपयोगी आहे हें स्पष्ट आहे. अलीकडे आपल्या देशाचा इतिहास, त्यांत ही मराठ्यांचा इतिहास प्राचीन बखरी, कागदपत्र इत्यादिकांच्या रूपानें प्रसिद्ध करण्याकडे मोठ मोठ्या लोकांचें लक्ष्य लागलें आहे व त्याप्रमाणें काव्येतिहास-संग्रहादि अनेक मासिक पुस्तकांतून आपला इतिहास बराच प्रसिद्धीस आला आहे. तो पाहिला असतां आपल्या धर्माची आणि लोकांची स्थिति सुधारण्याचा मराठ्यांनीं केवढा उद्योग केला, कोणतीं साधनें त्यांस अनुकूल झालीं व कोणतीं त्यांनीं दीर्घ प्रयत्नांनीं अनुकूल करून घेतलीं; त्यांनीं इतक्या सर्व उद्योगांत आपली नीतिमत्ता किती सांभाळिली व उदात्त गुणयुक्त असे किती पुरुष उत्पन्न झाले हें सर्व कळून येतें. अलीकडे आपली स्थिति अनेक कारणांनीं खालावत चालली आहे ती सुधारण्यास आपल्या इतिहासाचा अभ्यास आवश्यक आहे. आमच्या विद्याप्रिय आणि उदार सरकारांनीं हा विषय शिक्षण क्रमांत ठेविला आहे याचा

ही उद्देश हाच होय.

निर्णय सागर प्रेस मध्यें छापत असलेल्या काव्य—मालेंत श्रीगुमानि कविकृत उपदेशशतक प्रसिद्ध झालें आहे. त्यांत शंभर आर्या असून प्रत्येक आर्येच्या पहिल्या तीन चरणांत भारत भागवतादिग्रंथांतील एकादी विशेष गोष्ट सांगून त्या गोष्टी वरून निघत असलेला सामान्य उपदेश चवथ्या चरणांत सांगितला आहे. त्या धाटीवर हें पुस्तक तयार केलें आहे यांत फक्त मराठ्यांच्या इतिहासांतीलच गोष्टी घेतल्या आहेत. यांत एकंदर एकशे एक पद्यें असून बहुधा शेवटच्या चरणांत उपदेशपरवाक्य [मॉरल] आहे. गोष्टी शिवाजी पासून शेवटच्या बाजीरावापर्यंत अशा ऐतिहासिक क्रमानेंच बहुधा सांगितल्या आहेत.

ज्यांनीं मराठ्यांचा इतिहास फारसा पाहिला नाहीं, त्यांस अपरिचित अशा पुष्कळ गोष्टी यांत आल्या आहेत. व असल्या गोष्टी इतिहासाचा केवळ जीव होत; ह्मणून त्यांवरच मुख्यत्वें कटाक्ष ठेवून हें शतक लिहिलें आहे. पद्यांत सांगितलेल्या गोष्टी पूर्णपणें माहीत असल्या शिवाय पद्यांचा अर्थ चांगला ध्यानांत येणार नाहीं, ह्मणून त्या त्या गोष्टी टीपांत बहुधा पूर्ण पणें लिहिल्या आहेत. व त्यांचे आधार ही दाखविले आहेत. मूळश्लोक मोठ्या अक्षरांत लिहून प्रत्येकावर टीप दिली आहे. टीपांत प्रथमतः गोष्ट, नंतरत्यापद्यांत आलेल्या अलंकाराची माहिती, व शेवटीं प्रत्येक पद्याच्या चतुर्थचरणगत उपदेशाशीं समानार्थक संस्कृत भाषेंतील एकादा श्लोक अगर श्लोकांश दिला आहे.

यांतील पद्यें शुद्ध सरलार्थ व सालंकार करण्या विषयीं प्रयत्न केला आहे. हें पुस्तक शाळेंतील मुलांच्याही उपयोगाचें व्हावें असा उद्देश असल्यानें एकच प्रकारचें वृत्त न योजितां तीस बत्तीस प्रकारचीं वृत्तें योजिलीं आहेत. त्यांचीं नांवें प्रत्येक पद्यावर दिलीं आहेत. त्या वृत्तांचीं लक्षणें शाळांत चालू असणाऱ्या वृत्त—दर्पणांत आहेतच. वियोगिनी आणि नवनांदिनी अशीं दोनच वृत्तें नवीं आहेत, त्यांचीं लक्षणें टीपांत योग्य स्थळीं दिलीं आहेत. शाळांतील मुलांस अलंकारांची माहिती बिलकुल नसते ती थोडी तरी असणें चांगलें, ह्मणून यांतील पद्यांत आलेल्या अलंकारांची माहिती टीपांत थोडीशी दिली आहे. पद्यांतील कठीण शब्दांचा कोश शेवटीं जोडिला आहे.

याप्रमाणें नीति, इतिहास, वृत्तें व अलंकार यांहीं हें शतक जितकें उपयुक्त करवलें तितकें केलें आहे. गुणदोष पाहणें हें सुजन विद्वानांकडे आहे, कारण —

शून्येपिच गुणवत्तामातन्वानः स्वकीय-गुणजालैः
विवराणि मु[illegible]द्रागूर्णायुरिव सज्जनो जयति ॥

ह्मणून ते गुणांचें ग्रहण व दोषांची माफी करून माझ्या श्रमाचें चीज करितील अशी आशा आहे.

या शतकाची हस्तलिखित प्रत आधुनिक महाराष्ट्र कविकुल—मुकुट-मणि श्रीमंत राजश्री बापुसाहेब पटवर्धन कुरुंदवाडकर यांस दाखविली त्यांनीं पसंत करून व न्यूनाधिक वाटलें तेथें सूचना करून छापण्या बद्दल मोठा उदार आश्रय दिला याबद्दल त्यांचे महदुपकार आहेत. तसेंच मे. रा. सा. त्रिंबकरावजी नातू बी. ए. ए. इ. इलाखा करवीर, मे. रा. सा. डे. ए. इ. सं. मिरज आणि कविवर्य वे. शा. सं. रा. रा. वासुदेव शास्त्री खरे संस्कृत टीचर मिरज हायस्कूल यांनीं ही मूळ प्रत वाचून पाहून अशा इष्ट पद्धतीनें इतिहास लोकांपुढें आणिल्याबद्दल व एकंदर रचने बद्दल पसंती दाखविली ह्मणून त्यांचे आभार मानितों. तसेंच काव्येतिहास संग्रहादि ज्या ज्या ग्रंथांचा यांत आधार घेतला आहे त्यांच्या कर्त्यांचेही आभार मानून ही प्रस्तावना पुरी करितों.

गगनबावडा.
१७ । ८ । ९७ } **सदाशिव मोरेश्वरभिडे.**

इतिहासोपदेश शतक.

दुसरी सवाई.

प्रथम असून अनादि अनंत हि शेवट लाविल तोचि हरी।
असुनि अधोक्षज इंद्रियजांप्रति गम्यचि निष्क्रिय विश्व भरी ॥
तप तपतां हि न सांपडतो परि भक्तमनींच सराग वसे।
सतत मुकुंदपदीं धरिजे दृढ भाव तरीच नरां गवसे ॥ १ ॥

शिखरिणी.

करी धर्मोद्धारा यवनमद सारा हि उतरी।
मराठ्यांची सत्ता सकलनिजदेशास वितरी ॥
सुरीतींला दावी हरुनि विपदा वीर शिवजी।
सदा प्रेमें गावी शिवनुति च दावील शिव जी ॥ २ ॥

---

१ जगदाद्य आणि अनादि, अनंत आणि परमगति, अधोक्षज आणि गोविंद, निष्क्रिय आणि विश्वपोषक असा प्रभु आहे. विशेषणांचीं हीं युग्में परस्पर विरोधि आहेत. या पद्यांत विरोधाभास अलंकार आहे. "आभासत्वे विरोधस्य विरोधाभास इष्यते." सगुण निर्गुण भेदें करून विरोध परिहार होतो. चतुर्थ चरणगत उपदेशाशीं समानार्थक संस्कृत चरण "कोध्येयो भगवान्विष्णुः"

२ शिवनुति या पदांत श्लेष आहे. शंकराची स्तुति व शिवाजीची स्तुति असे दोन अर्थ इष्ट आहेत. शिवाजी हा श्रीशंकराचा अवतार होय अशी प्राचीन व अर्वाचीन सर्व भाविक हिंदूंची समजूत आहे. या पद्यांत समुच्चय नामक अलंकार आहे. अनेक गुण अथवा क्रिया यांची एक कालींच जी स्थिति त्यास समुच्चय ह्मणतात. "बहूनां युगपद्भाव भाजां गुंफःसमुच्चयः"

रथोद्धता.

रामदास–गुरुच्या शिवें मनीं ।
कामदास चरणास चिंतुनी ॥
द्विण्मदास हरिलें जनस्तुतें ।
ध्याइजे गुरुपदाख्य वस्तु तें ॥ ३ ॥

माल्यभारा.

करिती स्वयशोर्थ संगरा जे ।
किति राजे परि एक हा विराजे॥
शिव गो–द्विजपाल राजरत्न ॥
करिजे गोद्विज–पालनीं प्रयत्न ॥ ४ ॥

द्रुतविलंबित.

स्वकुल हें विलसे नच भोसले ।
ह्मणुनि तें करण्यास जनीं भलें ॥
शिव धरा धवली स्वयशो–भरें ।
स्वकुल उद्धरिजे सुकृतें नरें ॥ ५ ॥

---

३ शिवाजीनें रामदासस्वामीस गुरु केलें होतें हें सुप्रसिद्धच आहे.

१ द्विट्‌ह्मणजे शत्रु, त्याच्या गर्वास.

४ शिवाजी हा इतर सर्व राजांहून अधिक शोभत होता. याचें कारण इतर राजे आपल्यास कीर्ति मिळावी ह्मणून युद्धें करीत; आणि शिवाजी हा केवळ गोब्राह्मणांच्या रक्षणा करितांच यत्न करीत होता असें गोद्विजपाल या विशेषणानें सूचित केलें. येथें काव्यलिंग नामक अलंकार आहे. " समर्थनीयस्यार्थस्यकाव्यलिंगंसमर्थनं "

५ भोसले कुल हें उदेपुर येथील क्षत्रियजातीय होय. चतुर्थचरणगत उपदेशाशीं सदृशार्थक " स जातो येन जातेन यातिवंशःसमुन्नतिं " हें श्लोकार्ध आहे.

मात्यभारा.

श्रवणां कारि तृप्त आदरानें ।
शिव रामायण–भारतामृतानें ॥
ह्मणुनीच अपूर्व तेज पावे ।
इतिहासाध्ययना सदा करावें ॥ ६ ॥

प्रहर्षिणी.

मालोजी पडुनि विरेस जाधवासी ।
निष्ठेनें बहु तपला महातपासी ॥
राज्याचा वर निज–वंशिं थोर पावे ।
उद्योगीं रत पुरुषें सदा असावें ॥ ७ ॥

---

६ शिवाजी हा भारत भागवत रामायण इत्यादिकांवर फार प्रेम ठेवून त्याकथा नेहमी ऐकत असे. (ग्रां. डफ.)

७ शिंदखेडच्या जाधव रावानें रंगपंचमीचे दिवसीं भरसभेंत आपली मुलगी जिजाबाई शहाजीस देतों असें सर्वांदेखत कबूल करून, अखेर " तुह्मी आमचे चाकर, कमीयोग्यतेचे आहां" असें मालोजीस सांगितलें, व मुलगी देण्याचें नाकारलें. त्या योगानें मालोजीस ईर्ष्या चढून त्यानें अनेक पुण्य कर्मे फार निष्ठेनें करून श्रीशंभूची सेवा केली. तेव्हां प्रभूनें प्रसन्न होऊन "तुझ्या वंशांत सत्तावीस पिढ्या राज्य दिलें." असा वर दिला. (म. सा. छो बखर.) चवथ्या चरणांतील उपदेशाशीं समानार्थक संस्कृत चरण " उद्योगः खलु कर्तव्यः ".

उपजाती.

ज्याची शिवा दे जनतेस आजी ।
अन्वर्थ-नामा विलसे शिवाजी ॥
स्वनाम मोठें करणी न कांहीं ।
असें न व्हाया जपणें नरांहीं ॥ ८ ॥

गीति.

स्वामीच्या आम्रफला स्वयें चुकुनि तोडितांचि तो लावी ॥
शासन स्वतास दादा चुकतां शिक्षा स्वतासहि करावी ॥ ९ ॥

गीति.

श्रीरामदास पाडिति सद्रीती राम राम बोलावें ॥
नच जोहार वदावें मोडावें व्यर्थ सार्थ जोडावें ॥ १० ॥

---

८ शिवाजी राजानें युद्धें केलीं तीं नेपोलियन किंवा सीझर प्रमाणें केवळ स्वपराक्रम गाजविण्या करितां केलीं नाहींत, तर वाशिंग्टन प्रमाणें स्वजनांच्या कल्याणार्थच केलीं. हा अर्थ त्याच्या नांवांत ही आहे. शिवा (कल्याणा) करितां आजी (युद्ध) ज्याची तो. यांत निरुक्ति नामक अलंकार आहे. " निरुक्तिर्योगतो नाम्नामन्यार्थत्वप्रकल्पनम् " एकाद्या नांवाचा दुसराच अर्थ केला असतां हा अलंकार होतो. " गुणग्रामाभि संवादि नामापि हि महात्मनाम् यथा सुवर्ण-श्रीखंड-रत्नाकर-सुधाकरा: " हा श्लोक चतुर्थ चरणगत उपदेशाशीं समानार्थक आहे.

९ दादोजी कोंडदेव यांनीं सरकारी आंबे आपण तोडल्या बदल आपला हात तोडावा असें महाराजांस सांगितलें परंतु महाराजांनीं तें मान्य केलें नाहीं. तेव्हां त्यांनीं आपल्या आंगरख्याची अस्तनी लांडी केली. (श्रीशि. छ. स. प्र. चरित्र.)

१० यांविषयींची कथा रामदास स्वामीच्या बखरींत आहे.

वसंततिलक.

जो भेटिचें मिष करून यमालयाला ।
धाडावयास सजला शिव–राजयाला ॥
अफ्जूल आपणच तो झणिं मृत्यु सेवी ।
दुर्वासना न कवणा विषयीं धरावी ॥ ११ ॥

विबुधप्रिया.

" मानसीं अफजूलखां कपटी, " शिवा जरि ठाउकें ।
मर्दिलें प्रथम क्षमापतिनें तया नच धार्मिकें ॥
वार तो करि तैं वधी ह्मणुनीच हा स्तुत जाहला ।
त्यागिजे नच नीतिच्या सरला पथा कधिं मंगला ॥ १२ ॥

शिखरिणी.

प्रतिज्ञा ठोकोनी मिरवुनि बलप्रौढिस निघे ।
सवें सेना मोठी प्रबळ अफजुलखानगज घे ॥
शिवाजी–पंचास्य–प्रखर–नखभिन्नोदर मरे ।
कृती पूर्वी केव्हां बडबड करावी न चतुरें ॥ १३ ॥

---

११ अफजूलखानाच्या मनांत शिवाजीस धरून न्यावें किंवा मारून टाकावें असें होतें. " यः परस्य विषमं विचिंतयेत्प्राप्नुयात्स कुमतिःस्वयं हि तत्. "

१२ अफजूल खानाचा वरील बेत शिवाजीस माहीत होता तेव्हां अगोदर शिवाजीनेंच त्यास वार केला असता तरी नीतिदृष्ट्या ठीकच होतें. पण तसें शिवाजीनें केलें नाहीं. आपल्या रक्षणाचा बंदोबस्त मात्र पुरा करून तो भेटीस गेला व जेव्हां खानानें आधीं मस्तकावर वार केला तेव्हां त्यावर शिवाजीनें हात चालविला; ही गोष्ट सर्व बखरकारांस संमत आहे. या बद्दल विवेचन धोमेमहाबळेश्वर वर्णनांत फार सुरेख केलें आहे.

या पद्यांत क्षमापति व धार्मिक हीं विशेषणें साभिप्राय आहेत ह्मणून येथें परिकरालंकार होय. " अलंकारः परिकरःसाभिप्राये विशेषणे ".

" न्याय्यात्पथः प्रविचलंति पदं न धीराः "

१३ अफजुल्खान आणि गज व शिवाजी आणि सिंह यांचें तादूप्य वर्णिलें आहे ह्मणून येथें रूपकालंकार होय. " शरदि न वर्षति गर्जति व-

शिखरिणी.

जिजाई मातेला समजुनि-महादैवत असें ।
सदा कार्यारंभीं पदकमल तीचें नमितसे ॥
अशा पुण्यें राज्योदय शिव करी दुष्कर तरी ।
भजावी माता ती खचितचि विपत्सागरतरी ॥ १४

गीति.

लेखन सुरेख ह्मणुनी बाळाजी ऋणविमुक्ति तो पावे ।
पद ही चिटनविशीचें एका तरि सद्गुणासि मिळवावें ॥ १५

हरिणी.

जनक पडला बंदी मार्जी सुतें रिपु सेविला ।
बहुदिन जरी कारावास स्वतास हि भोंवला ॥
तरि सजविलें राज्यश्रीतें शिवें विलसद्गुणें ।
व्यसन पडलें प्रारब्धाला तरी नच सोडणें ॥ १६ ॥

गीति.

निजतात–मुक्ति साठीं शरण विजापुरपतीस नच जावें ।
स्त्रीवच हें शिव मानी स्त्रीसुविचारास आदरें घ्यावें ॥ १७ ॥

र्षति वर्षासुनिःस्वनो मेघः । नीचो वदति न कुरुते न वदति सुजनः करोत्येव. ”

१४ “ मातृ देवो भव. ”

१५ बाळाजी आवजीचें अक्षर फार चांगलें व मजकूरही बहुत सुंदर असें पाहून त्यांस कर्ज होतें तें वारून आपणाजवळ आणून शिवाजी महाराजांनीं त्यांस चिटनविशी दिली. (शि. छ. स प्र चारित्र.)

१६ शहाजी राजास विजापुर करांनीं प्रतिबंधांत ठेविलें, संभाजी एकदां दिल्लीरखानास मिळाला व स्वता शिवाजीस दिल्लींत अटक झाली.

“ विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाःप्रारब्धमुत्तमजना न परित्यजंति. ”

१७ “ युक्तियुक्तं प्रगृण्हीयाद्बालादपि विचक्षणः ”

चामर.

पाठलाग सोडिला ह्मणून भूप धिक् वदे
तापुनी प्रताप तोंड शत्रुला पुन्हाहि दे ॥
घोर युद्धिं तो निमे व्यथा वरी शिवांतर ।
एकनिष्ठसेवका न बोलिजे सुनिष्ठुर ॥ १८ ॥

मालिनी.

धरुनि यवननारी अद्वितीय-स्वरूपा ।
नृपतिस उपभोग्या बोलती भृत्य भूपा ॥
परि पतिनिकटीं ती धाडिली श्री शिवानें ।
प्रभुपणिं हि न जावें अल्पही दुष्पथानें ॥ १९ ॥

शिखरिणी.

नसे सेना देना कवण निजसाहाय्य अरिचा ।
सभोंतालीं घेरा, तरि न खचवी धीर मनिचा ॥
शिवाजी तो गेला यवनप-करीं देउनि तुरी ।
न सोडावें धैर्या शिरिं हि पडला डोंगर तरी ॥ २०

---

१८ विजापुरच्या फौजेचा पाठलाग करून पुरता मोड केला नाहीं ह्मणून शिवाजी प्रतापरावास रागें भरला. तेव्हां ईर्षेनें त्यानें विजापुरच्या फौजेवर हल्ला केला त्यांत तो मृत्यू पावला. तेव्हां असलें वीररत्न हरपल्या बद्दल शिवाजीस फार दु:ख झालें. यांत शत्रूला तोंड देणें ह्मणजे शत्रूशीं भिडणें असा अर्थ आहे. ह्मणून लोकोक्ति अलंकार होय. " लोकप्रवादानुकृतिर्लोकोक्तिरितिभण्यते. "

१९ कल्याण येथें आबाची सोनदेव यांस एक अनुपमलावण्यवती यवनी सांपडली होती. ती त्यांनीं महाराजांस दाखविली त्या प्रसंगास अनुलक्षून ही कविता आहे. " आईसाहेबांचें असें रूप असतें तर आपणही असेच सुंदर झालों असतों, परस्त्रीवर नजर ठेवूं नये, त्यांत राजानें तर फारच जपावें. " इत्यादि उद्गार शिवाजीनें त्यावेळीं काढिले. (शि० छ०स०प्र० च०)

२० यवनप-करीं देउनि तुरी ह्मणजे औरंगजेबास फसवून. एखाद्या

शिखरिणी.

जगज्जेता कोठें अलमगिर दिल्लीपति बळी ।
शिवाजी हा कोठें धनबल जयाचे न जवळीं ॥
जयश्रीला लाभे तरि हरि वरी घालुनि भर ।
स्वकार्याच्या सिद्धी स्तव सतत ध्यावा प्रभुवर ॥ २१

हरिणी.

धनबल तशी सत्ता मोठी असे यवनाकरीं ।
परवश अशा हिंदूलागीं मिळे नच भाकरी ॥
तरि उभविलें उत्साहानें स्वराज्यहि या जनें ।
हृदयिं धरिजे उत्साहातें जरी नच साधनें ॥ २२ ॥

गीति.

जिंकून रायबागिण सावित्रीपाटलीण वीर्यवत्या ।
शिव जीवदान दे त्यां स्त्रीची करिजे कदापि नच हत्या ॥ २३

च्या हातावर तुरी देणें ह्मणजे त्यास फसविणें, येथें लोकोक्ति अलंकार आहे. तसेंच मस्तकावर डोंगर पडणें–कोसळणें, ह्मणजे महासंकट प्राप्त होणें. येथें ही लोकोक्ति अलंकार आहे.

" त्याज्यं न धैर्यं विधुरेपिकाले धैर्यात्कदाचिद्गतिमाप्नुयात्सः "

२१ शिवाजीनें आपल्या महत्कार्याचा सर्व भार श्रीभवानीवर ठेविला होता. यांत विषमालंकार आहे. अननुरूप पदार्थांची घटना असतां विषम होतो. " समाप्ति–कामो मंगलमाचरेत्. "

२२ " क्रिया–सिद्धिःसत्वे भवति महतां नोपकरणे " या पद्यांत विरुद्धगुणन्यास नामक अलंकार आहे.

२३ रायबागीण ही माहूरच्या देशपांडयाची स्त्री मोठी शूर होती. ही दिल्लीपतीच्या वतीनें शिवाजीशीं लढण्यास आली होती. सावित्री पाटलीणं ही बागेवाडीची. हिनें एक महिनाभर गांव लढविला. व बाहेर येऊन स्वतः तीन दिवस तरवार चालविली. [म. सा छोटी बखर.] " कृतघ्नस्य शिशुघ्नस्य स्त्रीघ्नस्यपिशुनस्यच, चतुर्णामपि चैतेषां निष्कृतिर्नैव विश्रुता. "

नवनंदिनी.

शिबिकेंत तात वसवून शहाजी ।
पदचारि जाय नत भूप शिवाजी ॥
अभिमानहीन कळवी स्वकथांला ।
वरिजे गुरुपुढति नम्रपणाला ॥ २४ ॥

वियोगिनी.

जयसिंग बली बघूनियां ।
निजराज्यांतिल भाग दे तया ॥
शिव संधि करी सुधीश तो ।
त्यजणें अर्ध समस्त जाय तों ॥ २५ ॥

---

२४ शहाजी राजे व शिवाजीमहाराज यांच्या भेटीच्या प्रसंगास अनुलक्षून हें पद्य आहे. " कःसूनुर्विनयंविना. "
हें नवनंदिनीवृत्त तात्यांच्या वृत्तदर्पणांत नाहीं, ह्मणून त्यांच्याच धाटीवर याचें लक्षण लिहितों " नव नंदिनी वदति वृत्त तयास सजसासगाविलसतात जयास । पादिं अक्षरें त्रिदश संमित गावीं बुधभाषणें निजमनीं मुरवावीं. "

२५ औरंगजेबानें शिवाजीवर जयसिंगास पाठविलें त्या प्रसंगास अनुलक्षून वरील पद्य आहे. त्या वेळीं शिवाजीनें २७ किल्ले व कांहीं मुलूख देऊन तह केला. चवथ्या चरणांत लौकिक ह्मणीचा उपयोग केला आहे. अशा ह्मणींच्या तात्पर्यावर दृष्टि द्यावयाची असते सबब येथें छेकोक्ति अलंकार झाला. "छेकोक्तिर्यत्र लोकोक्तेः स्यादर्थांतरगर्भता "
हें वियोगिनी वृत्त अर्ध समवृत्तांपैकीं आहे. तात्यांच्या दर्पणांत हें नाहीं ह्मणून त्यांच्याच शैली प्रमाणें याचें लक्षण लिहितों. " विषमीं ससजागा शोभती समिं साभारलगा जयेस ती । विषमीं दश अक्षरीं जनीं समिं रुद्रीं विलसे वियोगिनी. " " सर्व नाशे समुत्पन्ने ह्यर्धं त्यजति पंडितः "

प्रहर्षिणी.

व्यंकोजी कुमति तया नसे सुरीति ।
बोधी त्या बहु रघुनाथपंत नीति ॥
मानी ना, मग बुध तो त्यजी तयाला ।
सेवावें नच कधिं ही कुभूमिपाला ॥ २६ ॥

गीति.

विद्वद्ब्राह्मणवेषें मादण्णातें प्रसन्न करि साधी ।
रघुनाथ राजकार्या योजावी युक्ति शक्तिच्या आधीं ॥ २७

इंद्रवज्रा.

कर्णाट घ्यायास निघे शिवाजी । भागापुरीशा यवनास राजी ॥
ठेवून तो शोभतसे यशानें । संपादिजे मित्रबला नरानें ॥ २८ ॥

२६ रघुनाथ नारायण यांनीं व्यंकोजीस बोध केला त्या प्रसंगास लक्षून हें पद्य आहे. " कुभूमि पालं न सेवेत. "

२७ रघुनाथ नारायण हे व्यंकोजीस सोडून शिवाजीकडे जात असतां एकादें राजकारण संपादून जावें असा विचार करून हैदराबादेस गेले तेथें अकण्णापंत व मादण्णापंत ह्मणून दोघे ब्राह्मण दिवाणगिरीवर होते. पंतांनीं आपण कोणी मोठे पंडित आहों अशा बाण्यानें मादण्णापंतांची भेट घेतली. व सभेंत प्रथम शिव सर्वोत्तम हा पक्ष सिद्ध केला. पुढें विष्णुपक्ष निर्बल झाला असें पाहून विष्णु सर्वोत्तम असें सिद्ध केलें त्यावेळीं त्यांची थोर विद्वत्ता पाहून दिवाण प्रसन्न झाले आणि यांची संभावना करूं लागले तेव्हां एकांतीं गांठ घेऊन पंत ह्मणाले, "मी या इच्छेनें आलों नाहीं, मी पंडित नव्हे. मी शिवाजी राजाचा सेवक आहें. महाराजांस कर्नाटकांत जावयाचें, तेव्हां आपल्या बादशहानें त्यांस साहाय्य करावें. " हें ऐकून मादण्णापंत प्रसन्न झाले आणि त्यांनीं साहाय्य देऊं असें सांगितलें. (स. प्र. चरित्र.) हें राजकारण शिवाजीस स्वसामर्थ्यानें ही सिद्ध करितां आलें असतें पण पंतांनीं शक्तीच्या आधीं युक्ति योजिली. कदाचित् पराक्रमानें ही इतकी सिद्धि मिळाली नसती " उपायेनहि यच्छक्यं न तच्छक्यं पराक्रमैः ".

२८ बादशहाची भागानांवाची एक कलावंतीण होती तिच्या बंगल्याभोंवतीं जें शहर वसलें तें भागानगर. यास हल्लीं हैदराबाद ह्मणतात. " अपि संपूर्णतायुक्तैः कर्तव्याः सुहृदो बुधैः ".

यूथिका.

भूखना कविस आश्रय दे शिव ।
तो कवी रुचिर काव्य करी नव ॥
गाय तो शिवपराक्रम त्यामधें ।
सत्कवींस बहु आदरिजे बुधें ॥ २९ ॥

वसंततिलक.

श्रीरामदासपद सेवितसे शिवाजी ।
ब्रह्मेंद्रपादकमलीं अलि होय बाजी ॥
दोघेहि वीर वरिती अतुला यशाला ।
जावें नरें शरण साधुसुरद्रुमाला ॥ ३० ॥

गीति.

विप्रांगनाभिलाषें संपादी शंभु निजपितृक्षोभ ।
बहुकाळ बंध पावे परस्त्रियेचा धरूं नये लोभ ॥ ३१ ॥

---

२९ शिवाजीनें भूखन नांवाच्या कवीस आपल्या आश्रयास ठेविलें होतें. त्यानें शिवभूषण नामें एक अलंकारशास्त्रावर ग्रंथ केला आहे. त्यांत अलंकारांचीं लक्षणें देऊन उदाहरणें शिवपराक्रमाचीं दिलीं आहेत. हा ग्रंथ काव्येतिहासांत प्रसिद्ध झाला आहे.
" दिवमप्युपयातानामाकल्पमनल्पगुणगणा येषां रमयंति जगंति गिरः कथमिव कवयो न ते वंद्याः "

३० ब्रह्मेंद्र स्वामी धावडशीचे. यांचें चरित्र काव्येतिहासांत प्रसिद्ध झालें आहे. " वदनं प्रसाद सदनं सदयं हृदयं सुधामुचो वाचः । करणं परोपकरणं येषां केषां न ते वंद्याः ".

३१ कोणे एके दिवशीं हळदकुंकु समारंभास सर्व सुवासिनी स्त्रिया राजवाड्यांत आल्या असतां एका रूपवती स्त्रीस संभाजीनें आपल्या महालांत नेऊन तिजवर बलात्कार केला. ही गोष्ट महाराजांस समजल्यावर " पुत्र झाला म्हणून काय झालें, त्याचा त्याग करीन, त्यास शिक्षा करीन. " असें म्हणाले तेव्हां भिऊन संभाजी दिल्लीरखानास मिळाला. पुढें त्यास धरून शिवाजीनें पन्हाळ्यावर अटकेंत ठेविलें. (सप्त. चरित्र.) " कुर्यान्नपरदारेच्छां सीतार्थी रावणो हतः "

स्वागता.

होउनी मधुविमोहित जाय । रक्षणास सुचतां न उपाय ॥
बंध हिंदुपति शंभुहि पावे । मद्य-सेवन कधीं न करावें ॥ ३२ ॥

वसंततिलका.

श्रीरामदासकृत बोधसुधा त्यजून ।
आकंठ त्या कलुषमंत्रविषा पिऊन ॥
तो शंभु-भूपति हि दुर्मरणास पावे ।
द्यावे न कान कुजना सुजनोक्त प्यावें ॥ ३३ ॥

गीति.

कलश-त्रिंबक-संगें दुष्टपथें शंभुबाजि आचरती ॥
तेणें व्यसनीं पडती दुर्जनसंगति करूं नयेच रती ॥ ३४ ॥

---

३२ संगमेश्वर येथें तकरीब खानानें संभाजीस धरिलें त्यावेळीं तो दारू पिऊन बेहोष झाला होता. (हिं.कथारस.)

" चित्ते भ्रांतिर्जायेत मद्यपानाद्भ्रांतेचित्ते पापचर्यामुपैति ।
पापं कृत्वा दुर्गातिं याति मूढ स्तस्मान्मद्यं नैव पेयं न पेयम् ॥ "

३३ या पद्यांत कलुशा या पदाबद्दल कलुष असें पद योजिलें आहे तेणें करून त्या शद्बाच्या अर्थभिन्नत्वानें निरुक्तिनामक अलंकार साधला आहे. " निरुक्तिर्योगतो नाम्नामन्यार्थत्वप्रकल्पनम् " बोध आणि सुधा व मंत्र आणि विष यांचें तादूप्य आहे ह्मणून रूपकालंकार होय. कुजनास कान न द्यावे यांत कान देणें ह्मणजे ऐकणें असा अर्थ आहे ह्मणून ही लोकोक्ति होय. पिणें हा धर्म जलादिपदार्थावर संभवतो त्याधर्माचा उपयोग उक्ती विषयीं केला आहे ह्मणून येथें समाधि नामक गुण झाला.

३४ संभाजीनें कलुशास " कविकलशपंडितराव " असा किताब दिला होता. तेव्हां त्यांतील कलश नांवाचा येथें उपयोग केला आहे. कलुशाच्या संगतीनें संभाजी बिघडला व त्रिंबकजी डेंगळ्याच्या संगतीनें शेवटचे बाजीराव बिघडले असा अन्वय आहे ह्मणून येथें यथासंख्य नांवाचा अलंकार झाला. " यथासंख्यं क्रमेणैव क्रमिकाणां समन्वयः शत्रुं मित्रं विपत्तिं च जय रंजय भंजय. " " दुर्जनेन समं सख्यं प्रीतिं चापि न कारयेत् "

गीति.

ऐश्वर्यप्रद यावनधर्म न वरि मृत्युला करि पसंत ।
श्रीशिवसुत संभाजी सोडुं नये धर्म होय जरि अंत ॥ ३५

विद्युन्माला.

म्लेच्छेशाला दिल्लीपाला शंभू निंदी तद्धर्माला ।
तेव्हां पावे पंचत्वाला नोच्चारावें दुर्वाक्याला ॥ ३६ ॥

शार्दूलविक्रीडित.

औरंगें निजराज्य सर्व हरिलें नाहीं बसाया स्थल ।
राजाराम असें विलोकुनि निघे जिंजीकडे निर्बल ॥
वाण्याचा मग वेष घेउनि जनां "यात्रेकरू" भासवी ।
नाहीं स्वस्थिति चांगली प्रकट तों वर्तू नये मानवीं ॥ ३७

---

३५ या पद्यांत मृत्यु हा दोषरूप आहे परंतु त्याच्या सेवनानें धर्म रक्षण होतें ह्मणून तोच पसंत केला ह्मणून येथें अनुज्ञा नामक अलंकार झाला. "दोषस्याभ्यर्थनाऽनुज्ञा तत्रैव गुण दर्शनात्" शिवसुत हें विशेषण साभिप्राय आहे ह्मणून परिकरालंकार होय. "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मोभयावहः"

३६ हृदि विद्ध इवात्यर्थं यया संतप्यते जनः पीडितोपि हि मेधावी न तांवाचमुदीरयेत्.

३७ औरंगजेबानें संभाजीस मारिल्यानंतर सर्व मराठी राज्य घेतलें. तेव्हां राजारामास आसरा नाहींसा झाला. तेव्हां कर्नाटकांत जिंजी तेवढी मराठ्यांकडे राहिली होती. तेथें जावें असा विचार सर्वानुमतें ठरून राजाराम निघाला. वाटेंत शत्रुपक्षांतील कोणीही ओळखूं नये ह्मणून राजारामसाहेबांनीं वाण्याचा वेष घेतला होता. (चि.कृ.राजा. चरित्र.) "दुरवस्थो न प्रकाशः स्यात्"

मत्तमयूरी.

द्वेषें कोंडो विठ्ठल वार्ताहर होई ।
खंडोबल्लाळास रिपूच्या करिं देई ॥
तेव्हां राजाराम तयाला बहु दंडी ।
केव्हां कोणाची हि करावी न चहाडी ॥ ३८ ॥

गीति.

समर महाराजबला-सह संताजी करीतसे अनयें ॥
होई च्युतपद तेव्हां स्वस्वामीशीं विरुद्ध होउं नयें ॥ ३९ ॥

गीति

वचननिबद्ध बहुतकर बहुत करोनी प्रयत्न दिनरजनी ॥
करवीरराज्य पाळी अंगीकृत रक्षिजे सदा सुजनीं ॥ ४० ॥

---

३८ जिंजीकडे कुमक पाहिजे अशी सूचना रामचंद्रपंत हुकुमतपन्हा यांस करण्याकरितां राजारामानें खंडोबल्लाळ यांस त्यांकडे पाठविलें होतें. चिटणीस हे त्रिवदी प्रांतांत अरुणाचलाच्या ठाण्यांत वस्तीस गेले. तेथें कोंडोविठ्ठल हा ओळखीचा पूर्वद्वेषी होता. त्यानें यवनास बातमी देऊन चिटणिसांस कैद करविलें. पुढें झुल्पिकारखानानें चिटणिसांस मुक्त केलें. हें राजाराममहाराजांस समजल्यावर त्यांनीं कोंडोविठ्ठलास कैद करून जिंजींत ठेविलें होतें. (चि.क. राजारामाची बखर.) " वदने विनिवेशिता भुजंगी पिशुनानां रसनामिषेण धात्रा अनया कथमन्यथावलीढा नहि जीवंति जना मनागमंत्रा:"

३९ संताजी घोरपडे यानें राजाराममहाराजाच्या लोकांशीं खटला करून लढाई केली. तेव्हां महाराजांनीं माने सरदार पाठवून संताजीवर हल्ला करविला. पण सरदारलोकांनीं रदबदली करून " मातबर माणूस चाकरीवर मारावें " असें सांगून हल्ला रहित करविला. तरी इतराजी झाली. संताजीचें सेनापति पद काढून धनाजी जाधवास दिलें (चि. राजा. ब.)

४० रामचंद्रपंत बहुतकर (बावडेकर) यांनीं आपण ताराबाईचा पक्ष सोडणार नाहीं अशी शपथ घेतली होती. ह्मणून ते शाहूस मिळाले नाहींत. यांनीं आपलें चातुर्य, मुत्सद्दीपणा आणि शौर्य यांचा उपयोग को-

स्रग्धरा

शिर्के बोले स्ववंशक्षयकर म्हणुनी सूड या भोसल्यांचा ।
घेऊं सोडूं न देशोद्धरणकृति तशी तूमची शुष्क वाचा ॥
खंडोबल्लाळ तैं त्या वतन लिहुनि दे ने नृपा जिंजितून ।
जाणावें देशकार्या अधिक, हित जरी अन्य त्याहून ऊन ॥४१

ल्हापुरच्या राज्याची बळकटी करण्यांत केला. या पद्यांत बहुतकर या आड-नांवाचा दुसराच अर्थ बहुतकरोनी या पदानें सूचित केला, म्हणून येथें निरुक्तिअलंकाराचा ध्वनि आहे. बहुतकर हें विशेष्य साभिप्राय आहे म्हणून परिकरांकुर अलंकार झाला. " अंगीकृतं सुकृतिनः परिपालयंति. "

४१ राजाराम महाराज जिंजीवर असतां झुल्पिकार खानानें जिंजीला वेढा दिला. तेव्हां जिंजींतून महाराजांनीं पार कसें निघून जावें याचा विचार पडला. त्यावेळीं खंडोबल्लाळ चिटणीस पाळण्यांतून खालीं शिरक्यांच्या गोटांत उतरले आणि त्यांच्या बाजूनें महाराजांनीं रात्रीं खालीं उतरावें, या कामास शिरक्यांनीं सहाय व्हावें, असें त्यांशीं चिटणीसांनीं बोलणें घातलें. शिरके व महाराज यांचा आप्तपणा होता. तथापि पूर्वी संभाजीच्या वेळीं कलुशा हा राज्य–विध्वंसक आहे, म्हणून त्यास ठार मारावें, असा शिरक्यांनीं बेत केला होता. तो बेत कलुशास आधीं समजल्या मुळें त्यानें संभाजी कडून शिरकाण करविलें (शिरक्यांचा क्षय.). तेव्हां शिरक्यांनींही भोसल्यांचा वंशक्षय करूं अशी प्रतिज्ञा करून झुल्पिकार खानाचा पक्ष धरिला होता. तेव्हां " आपण भोंसल्यांचा सूड घेणार, अर्थात आमचे साहाय्य तुम्हांस कसें मिळेल? " असें त्यांनीं चिटणिसांस सांगितलें. तेव्हां चिटणिसांनीं त्यांस अनेक प्रकारांनीं सांगितलें. " हिंदूंच्या राज्यवृद्धी करितां सर्वांनीं झटावें, संभाजीनें आमचेही वडील वगैरे बहुत पुरुष मारिले म्हणून आम्हीं हिंदुराज्याविरुद्ध झालों नाहीं. " असें म्हटलें. त्यावेळीं शिरक्यांनीं चिटणिसांचें दाभोळचे वतन त्यांस मागितलें. तेंही देऊं करून, त्यांचा स्नेह संपादून, महाराजांस त्यांच्या बाजूनें खालीं आणून, चिटणिसांनीं आपली निरुपम राजभक्ति व देशहितपरता प्रगट केली. (चि. राजारामाचें चरित्र) " भवति विदितमेतत्प्रायशो सज्जनानां परहितनिरतानामादरोनात्मकार्ये "

गीति

नृपता सुवर्णताही लोखंडे पावला पहा सार्थ ॥
शाहुनृपस्पर्शबलें महाजनां सेविज महत्वार्थ ॥ ४२ ॥

स्रग्विणी.

शाहु हा सत्य कीं मीं न त्या सेविलें ।
दुःख संक्राजिला फार हें जाहलें ॥
आण ना मोडवे जीव सांडी तदा ।
सत्यपक्षा नरें त्यागिजे ना कदा ॥ ४३ ॥

---

४२ पारद गांवच्या पाटलाच्या स्त्रीनें आपला मूल शाहूच्या पालखींत टाकिला. तेथें शाहूची फत्ते झाली ह्मणून त्या मुलाचें नांव फत्तेसिंग असें ठेविलें. त्याचें मूळचें उपनांव लोखंडे असें होतें, पण त्यास आपला पुत्र मानून भोसले असें त्याचें आडनांव ठेविलें, आणि त्यास अक्कलकोटचें संस्थान दिलें! हे भोसले राजे तसेंच त्यासही राजा केलें, आणि शिरके व मोहिते यांच्या मुलींशीं त्याचें लग्न केलें या प्रमाणें जो पूर्वीं सामान्य शूद्र होता त्यास उत्तम-वर्णत्व ह्मणजे क्षत्रियत्व मिळालें. या पद्यांत सुवर्णता, लोखंडे स्पार्श यांचे दोन दोन अर्थ आहेत. सुवर्णता ह्मणजे सोनेंपणा किंवा उत्तम-जातित्व लोखंडे हें उपनाम आणि दुसरा अर्थ लोखंड. स्पर्श म्हणजे शिवणें व परीस या प्रमाणें यांत श्लेषालंकार आहे. लोखंडे या नांवाचा दुसरा अर्थ धरिला म्हणजे निरुक्ति होते. " हीन सेवा न कर्तव्या कर्तव्यो महदाश्रयः "

४३ तुमचा पक्ष मी सोडणार नाहीं अशी संक्राजी नारायण सचिवानें ताराबाईस आणभाक दिली होती. पण शाहु हा खरा आहे असें कळल्यावर त्यास पेंचांत पडल्या सारखें झालें. अखेरीस त्या सत्पक्षाभिमानी सज्जनानें सन्यास घेऊन जीवंत समाधि घेतली. " अश्वमेध सहस्राद्धि सत्यमेव विश्यते "

स्रग्धरा.

आज्ञा दे क्रुद्ध शाहू प्रतिनिधिनयना काढण्या जेठ्याला ।
खंडो-बल्लाळ तेव्हां नृपहितपर तो तूर्ण धांवून आला ॥
जेठ्या ओढून काढी नृपतिस शमवी नीतिबोधामृतानें ।
बोधावा भूपती ही अनयपथग तो राजभव्यव्रतानें ॥ ४४ ॥

गीति.

थोरात बंड असुनी आणविला वचन देउनी ह्मणुनी ।
अटकावी शाहु न त्या न च व्हावें अप्रमाण निजवचनीं ॥ ४५

---

४४ परशुरामपंत प्रतिनिधि यांच्या वडील मुलानें विशाळगड करवीरकराकडे दिला. त्या कामांत प्रतिनिधीचें अंग आहे असें जाणून शाहूनें प्रतिनिधीचे डोळे काढावे असा पैलवानांस हुकूम केला. ही गोष्ट खंडोबल्लाळास समजतांच ते धांवत येऊन, परशुरामपंताच्या छातीवर तक्का ठेऊन कट्यारीनें डोळे काढण्यास तयार झालेल्या जेठ्यास मागें ओढून महाराजांपुढें गेले, आणि अशीं उग्रशासनें केल्यानें संभाजीचापरिणाम काय झाला तें ध्यानीं आणून महाराजांनीं प्रतिनिधीवर दया करावी, अशी त्यांनीं विनंति केली. त्यावेळीं शाहूनें शांत होऊन, प्रतिनिधीस रूप्याची बेडी घालून, किल्यावर प्रतिबंधांत ठेविलें. हा चिटणिसांनीं उपकार केला त्याचें स्मारक ह्मणून प्रतिनिधि श्राद्धाचे दिवशीं चिटणिसांचा एक पुरुष पितरां बरोबर भोजनास बसवीत. अलीकडे ही चाल त्यांच्या घराण्यांत चालत नाहीं. (काव्येतिहास). या पद्यांत नृपहितपर हें विशेषण साभिप्राय आहे ह्मणून परिकरालंकार झाला.

४५ दमाजी थोरात हा हिंगणगांवच्या गढींत राहून शाहूच्या मुलुखास उपद्रव देत असे. त्याला बोधाच्यादोन गोष्टी सांगाव्या म्हणून शाहूनें त्यास वचन देऊन जेजूरीवर बोलावून आणिलें. भेटीच्यावेळीं तो उन्मत्तपणानें शाहूशीं बोलला. त्या वेळीं जवळच्या लोकांनीं महाराजांस सांगितलें कीं, यास येथेंच कैद करावें. पण आपलें वचन गुंतलें आहे त्या अर्थी आतांच यास धरून ठेवणें योग्य नाहीं, असें म्हणून शाहूनें त्यास जाऊं दिलें. " सद्भिस्तु लीलयाप्रोक्तं शिला लिखितमक्षरम् "

वसंततिलका.

बाजीचिमाजिस विपत्तिमधें मयूर ।
दे खावया करि असा उपकार फार ॥
बल्लाल दे ह्मणुनि आश्रय थोर त्यासी ।
व्हावें कृतज्ञ उपकार करी तयासी ॥ ४६ ॥

भुजंगप्रयात.

करी श्रीपती विक्रमा संगरांत । भरी हर्ष तो शाहुच्या अंतरांत ॥
पित्याचें हरी दुःख कारागृहींचें । पिता सेविजे मूळ तें थोरवीचें ४७

शिखरिणी.

करा आज्ञा कृष्णातटतुरग-तृष्णा, सुविमलें ।
जलें सिंधूच्या मी हरिन रिपुगर्वासह बलें ॥
असें बाजी वाक्यामृत पिउनि शाहू हरिखला ।
प्रभूशीं वोलावी प्रिय हितकरा उक्ति विमला ॥ ४८ ॥

---

४६ थोरातानें बाळाजी विश्वनाथाच्या मनुष्यास अटकेंत ठेविलें होतें. त्या वेळीं बाजीराव व चिमणाजी आप्पा यांस मोरशेट करंज्या म्हणून एक गृहस्थ तेथें होता, तो रोज लाह्यांचे लाडू खावयास देत असे. पुढें बाळाजी विश्वनाथानें त्याचें सरकारांतून यथास्थित चालविलें (पेशव्यांची शकावली) " न हि कृतमुपकारं साधवो विस्मरंति "

४७ परशुरामपंतप्रतिनिधि अटकेंत होते त्यांनीं आपले द्वितीय पुत्र श्रीपतराव यास निरोप पाठविला "कीं खटावकरावर पेशवे जात आहेत त्यां बरोबर जाऊन युद्धांत पराक्रम करून महाराजांची मर्जी प्रसन्न करून माझी मुक्तता करावी नाहींतर त्या लढाईंत मरून जावें" या निरोपा प्रमाणें श्रीपतरावानें त्या लढाईंत जाऊन चांगली तरवार गाजविली तेणें करून शाहू प्रसन्न झाला व प्रतिनिधीची सुटका झाली. या पद्यांत प्रथम चरणार्थ द्वितीय चरणार्थास कारण आहे, तसेंच द्वितीय चरणार्थ तृतीय चरणार्थास कारण आहे म्हणून येथें कारणमाला अलंकार झाला. " पूर्वपूर्वस्योत्तरोत्तरहेतुत्वे-कारणाला " " पितृदेवोभव "

४८ हा प्रसंग चिटणीसकृत शाहूच्या चरित्रांत सुरेख वर्णिला आहे तो पहावा. रिपुगर्वासह तुरगतृष्णा हरिन या वाक्यांत सहोक्ति ना-

गीति.

शाहू संभाजीचा कलह मिटवितों वदे निजाम तदा ।
जाणे बाजी कावा कीजे मध्यस्थ शत्रुला न कदा ॥ ४९ ॥

उपजाति

चिमाजिला योग्य गणून ठेवी । त्याच्या करें खान विनाश सेवी॥
ज्याचें स्वनाशें हित निश्चयानें। ठेवूं नये चाकर तो बुधानें ॥ ५० ॥

दिंडी.

पुरुषविक्रम दावून उमाबाई ।
काळ अमदाबादिं ती अरिस होई ॥
तीस तोडा शाहु दे सोनियाचा ।
मान कीजे कृतकृत्य-सेवकाचा ॥ ५१ ॥

मक अलंकार झाला आहे. शत्रूंचा गर्व हरण केला ह्मणजे अर्थात् घोड्यांस सिंधूनदीपर्यंत नेतां येणार व त्यांची तहान ही भागणार. हरिन या पदांत दोन अर्थ असल्यानें ही श्लेषविद्धसहोक्ति झाली. वाक्य हेंच अमृत. हें रूपक. " अनुकूलं प्रियं चास्य वक्तव्यं जनसंसदि "

४९ करवीरकर संभाजीचा व शाहूचा राज्याबद्दल वाद होता. हा वाद मी मिटवितों असें निजामानें शाहूकडे बोलणें घातलें. पण बाजीरावानें निजामाचें कपट जाणून शाहूस सांगितलें कीं, हा पक्का ठग आहे, युक्तीनें आमचा नाश करणार आहे. हें ऐकून शाहूस निजामाचा फार राग आला आणि त्याची खोड मोडावी अशी त्यानें पेशव्यास आज्ञा केली. (ग्रां.डफ)

५० निजाम उल्मुलुख दांडगाईनें वागूं लागला ह्मणून दिल्लीपतीनें त्यावर शहाजतखा नामक सरदाराची योजना केली. तेव्हां निजामानें शाहूचें साहाय्य मागितलें, शाहूनें चिमणाजीआप्पास जाण्यास आज्ञा दिली. आप्पा निजामाकडे न जातां प्रथम शहाजतखानाकडेच गेले. व त्याच्या चाकरीस राहिले आणि एकेदिवशीं तो व त्याचे लोक बेसावध आहेत असें पाहून हल्ला करून त्याची त्यानें दाणादाणकेली. (पे. बखर.) यांत मराठे हे त्याकालीं दिल्लीपतीचे शत्रु असतां त्यांसच खानानें चाकरीस ठेविलें ही चूक केली.

५१ त्रिंबकराव दाभाडे याची मातोश्री उमाबाई मोठी शूर बायको

माल्यभारा.

मृगयार्थ उदाजिला बलावी । गुरु दावी मन शाहु सुस्वभावी ॥
रिपु तो तरि गौरवी सुभावें । अरिला ही स्वगृहागता पुजावें ॥ ६२

गीति

पादत्राण–त्राणें राणोजी सैन्य पालपद–पावे ।
हुजऱ्या केवळ असतां निजकर्तव्यांत दक्ष वागावें ॥ ६३ ॥

होती. अमदाबाद शहरीं जोरावरखां बाबी नांवाचा बादशाही चाकर होता त्यानें आसपास दंगा करून महाराजांचीं ठाणीं उठविलीं तेव्हां शाहूनें बाबूराव व यशवंतराव या उमाबाईच्या मुलांचीं त्यावर योजना केली आणि त्यांबरोबर उमाबाईसही जाण्यास सांगितलें. त्या मोहिमींत उमाबाईनें अंबारींत बसून, अंबारीस चिकाचे पडदे लावून व हत्यारबंद होऊन लढाई केली आणि मोठ्या शौर्यानें अमदाबाद घेऊन सरकारचीं ठाणीं सर्वत्र बसविलीं तेव्हां महाराजांनीं प्रसन्न होऊन बाईंच्या पायांत सोन्याचे तोडे घातले. व तिचा मोठा सन्मान केला. (दाभाड्यांची बखर.) " कृतकृत्यस्य भृत्यस्य कृतं नैव प्रणाशयेत् फलेन मनसा वाचा दृष्टया चैनं प्रहर्षयेत् " या पद्यांत उल्लेख अलंकार आहे उमाबाई ही स्वजनांस मनुष्य व शत्रूंस काळ झाली असें कल्पिलें आहे.

६२ उदाजी चव्हाण हा शाहूच्या मुलखांत चव्हाण चौथाई घेऊन पुंडपणा करीत असे. एकदां शाहूमहाराज अंबेरीच्या रानांत शिकारीस गेले होते त्या वेळीं त्यांनीं उदाजीस शिकारी करितां बोलावून आणिलें. आणि आठपंधरा दिवस उभयतांनीं शिकार केली. नंतर महाराजांनीं त्यास वस्त्रें वगैरेंनीं सन्मानून परत लावून दिलें. " अरावप्याचितं कार्यं आतिथ्यं गृहमागते. "

६३ राणोजी शिंदा हा बाजीरावाचा हुजऱ्या होता. ऐकेवेळीं तो बाजीरावाचे जोडे अगदीं आपले पोटशीं जपून धरून झोंपीं गेला होता. जोड्याचें रक्षण करणें हें आपलें कर्तव्य त्यानें फार दक्षतेनें केलेलें पाहून बाजीरावानें खुष होऊन त्यास सरदारी दिली. [बाजीराव चरित्र बापट कृत] " कर्तव्यमेव कर्तव्यं प्राणैः कंठगतैरपि. "

गीति.

त्रिंबक–घात जरी करि पाळी तद्दक्षिणा प्रघात तरी ।
धर्मज्ञाता बाजी संस्था प्राचीन रक्षिजे चतुरीं ॥ ९४ ॥

वसंत–तिलक.

बुंदेलखंड नृपती चतुराभिधानी
बाजीस ये शरण, हा स्वजनाभिमानी ॥
मर्दून तद्रिपु करी बहु तुष्ट त्याला ।
संरक्षिजे सतत कीं शरणागताला ॥ ९९ ॥

शालिनी.

मस्तानीला लुब्ध तो बाजि होय । तल्लुब्धत्वें कोपला शाहुराय ॥
त्याच्या कोपें हा लघुत्वास सेवी । वेश्या–स्त्रीची संगती नादरावी ९६

९४ पूर्वीं शाहूच्या आज्ञेनें दाभाडे तळेगांवीं ब्राह्मणास दक्षिणा देत असत. ती त्यांची रीति बाजीरावानें तशीच पुढें पुण्यास चालविली. यांत धर्मज्ञाता हें विशेषण साभिप्राय आहे ह्मणून परिकरालंकार होय. " पुरातनीं पालयेत् संस्थाम् "

९९ बुंदेल खंडाच्या चतुरसाल राजावर अहमदखान बंगष यानें स्वारी केली. तेव्हां त्या राजानें बाजीराव पेशव्याची मदत मागितली. त्या प्रसंगास लक्षून हें पद्य आहे. " शरणमुपेतो न हातव्यः "

९६ मस्तानी ही कलावंतीण शहाजतखांपाशीं होती. तिला चिमाजी आप्पानें आणिली व बाजीरावास अर्पिली. असें पेशव्यांच्या बखरींत आहे. बुंदेलखंडच्या राजानें बाजीरावास दिली असें ही आढळतें. ही निजामाच्या जनानखान्यांतून बाजीरावाकडे आली असें बापट कृत बाजीरावाच्या चरित्रांत आहे. या तीन्ही गोष्टींत खरी कोणती याचा निकाल कोठें वाचण्यांत आला नाहीं असो तिच्या नादांत पेशव्यानें राजदर्शन ही वेताचेंच ठेविलें अर्थात् त्याचें कारभाराकडे ही चित्त लागेना. तेव्हां महाराजानीं दोघां शाहण्यांस पाठवून त्यास फजीत केलें; व अधिकार काढून घेऊं अशी दहशत घातली. मग हे शुद्धीवर आले. या पद्यांत कारणमाला अलंकार आहे "एता हसंतिच रुदंतिच वित्तहेतो विश्वासयंति पुरुषं नच विश्वसंति । तस्मान्नरेण कुलशीलसमन्वितेन वेश्या स्मशान–घटिका इव वर्जनीयाः "

इंद्रवंशा.

म्लेच्छा मिळे शंभु अपाय होतसे ।
राज्यास तेणें, गणुनी मनीं असें ।
दे ताद्विभागा नृप शाहु सज्जन ॥
बंधूसवें चालविजे विरोध न ॥ ५७ ॥

कामदा

हिंगणे मदोन्मत्त तो धनी । ओळखीच ना आपला धनी ॥
हात दाविला राघवें तदा । वित्तमत्तता त्यागिजे सदा ॥ ५८

शार्दूल विक्रीडित

शिंदे होळकरासमान असती ज्याचे बली सेवक !
ऐसा ब्राह्मण पेशवा " समजतां नेपाल भूपालक ॥
शालिग्राम शिला पुण्यास नत तो धाडीतसे स्वव्ययें ।
आहे जो बलवंत त्यासह बुधें शत्रुत्वठेवूं नये ॥ ५९ ॥

---

५७ कोल्हापूरच्या पहिल्या संभाजी बरोबर इ.स. १६३० मध्यें शाहूनें तह केला. आणि स्वराज्याच्या वाटण्या करून कलहाचें मूळ बीज नाहींसें केलें. " नहि निजबंधुर्विरोद्धव्यः "

५८ पेशव्यांनीं आपलें तर्फे हिंगणे उपनामाचे वकील दिल्लीस ठेविले होते. तेथें बहुत दौलत मिळवून ते फार उन्मत्त झाले होते. एकदां त्यांनीं दादासाहेब पेशव्यास मेजवानी केली. त्यावेळीं पंक्तींत मोठ्या डौलानें येऊन " दादासाहेब ते कोणते? " असें सखारामबापूंस विचारिलें. तेव्हां आपला धनी कोणता हें यांस ओळखेना इतका हा उन्मत्त झाला आहे असें पाहून दादा साहेबांस मोठा क्रोध आला. उदक सोडिलें होतें सबब पंचप्राणाहुति मात्र घेऊन ते पानावरून उठले तेव्हां सर्व उठले. दादासाहेबांनीं आपल्या गोटांत येऊन हिंगण्यांचा वाडा लुटून फस्त करण्यास सिंदे होळकरांस हुकूम दिला. त्यांनीं वाडा पाडून खणून त्या जागेवर गाढवाचा नांगर फिरविला. (पे. बखर.) हात दाविला येथें श्लेकोक्ति अलंकार होय.
" प्राप्तैश्वर्यो नदृप्तःस्यात् "

५९ पर्वतीवर गंडकी शिळेची मूर्ति स्थापावी असें मनांत आणून नानासाहेब पेशव्यांनीं नेपाळच्या राजास त्या शिळा पाठविण्या बद्दल पत्र लिहिलें व जासूद रवाना केले. पण त्या राजानें जासूद रिकामे परत लावून

मालती

मुजफर नीच असे ठरे तरी । सकृप सदाशिव देइ चाकरी ॥
परि खल घात करूं पुन्हा सजे । खल नत ही जवळी न ठेविजे६०

वसंत तिलक

ओलांडितां पुढिल आंविल ओढियाला ।
गेलों वदे, गणुनि तो जलपार झाला ॥
मागील विप्र शिरुनी बुडती क्रमानें ।
वागूं नये कधिं हि अंध परंपरेनें ॥ ६१ ॥

दिले. त्यावरून पेशव्यांनीं शिंदे होळकरास आज्ञा केली कीं नेपाळच्या राजावर स्वारी करून तो राजा गंडकी शिला पुण्यास पाठवील असें करावें. शिंदे होळकरांची चाल आपणावर झाली हें समजतांच तो राजा फार भ्याला आणि त्यानें शिला स्वतःच्या खर्चानें पुण्यास पोचत्या केल्या. (पे. बखर) " अनुचित कर्मारंभो स्वजनाविरोधो बलीयसा स्पर्धा । प्रमदाजनविश्वासो मृत्योर्द्वाराणि चत्वारि "

६० मुजफरखान पठाण यानें एकदा फितुरी केली होती तरी तो पायां पडून चाकरी मागूं लागला म्हणून भाऊसाहेबांनीं त्यास ठेविलें. परंतु पुढें थोडयाच दिवसांनीं त्यानें भाऊचाच जीव घेण्याचा बेत करून मारेकरी पाठविला परंतु त्या संकटांतून भाऊसाहेब वांचले. मारेकरी पाठीमागून हत्यार चालवूं लागला इतक्यांत भाऊनीं कलमदानांतील शाई घेण्याकारितां हात पुढें केला. त्यामुळें मारेकऱ्याचा नेम चूकून जखम थोडी झाली. या कृत्याबद्दल मुजफरखानास देहांत प्रायश्चित्त मिळालें (भाऊसाहेबांची कैफियत) " दीनो रिपुरप्यनुग्राह्यः "

६१ कोंकणांतील कांहीं ब्राह्मण पुण्यास दक्षिणेस निघाले होते. ते आंविल ओढयावर आले. ओढयास पाणी फार होतें. पण रात्रीचा विषय पाण्याचा अदमास कळेना ह्मणून एकजण पुढें होऊन पाणी किती आहे तें पाहूं लागला पण तो लोंढयासरशी वाहवला त्यावेळीं तो "गेलों रे गेलों' असें ओरडला. तेव्हां 'हा पार गेला, पाणी फार नाहीं' अशा समजुतीनें दुसरा गेला. तोही वाहवतांना तसेंच ओरडला मग तिसरा गेला. या प्रमाणें सर्व ब्राह्मण त्या ओढयांत वाहवले [पंतप्रधानांची शकावली] या पद्यांत अंध परंपरेनें वागूंनये या लोकन्याया मध्यें अविचारानें कोणतेंही कृत्य दुसऱ्याचे

वसंत तिलक

यांतून ही प्रभु-कृपा जर वांचवील ।
वाढीन काल-वदनांत तुह्मां सलील ॥
दत्ताजि मृत्यु समयीं वदला रिपूला ।
शत्रुप्रति प्रकटिजे-नच दीनतेला ॥ ६२ ॥
" काशीस्थ विप्र सगळे खळ बाटवील
घ्यावी न ती ह्मणुनि" हें ठरवी सुशील ॥
नाना करी न रण तत्पुर-विप्र तारी ।
कीजे न कार्य बरवें हि अनर्थकारी ॥ ६३ ॥

पाहून करूंनये असें अर्थांतर आहे ह्मणून येथें छेकोक्ति अलंकार झाला " छेकोक्तिर्यद्वलोकोक्तेःस्यादर्थांतरगर्भिता "(कुवलयानंद) " अविवेकःपर मापदांपदम् " " गतानुगतिको लोको न लोकः परमार्थिकः "

६२ दत्ताजीशिंदा कुंजपुरावर पडला त्या वेळीं एक मुसलमान सर दार तेथें आला त्यानें शिंद्यास विचारिलें " क्यंव् पटेल, तुं मराठे लोग हमारे साथ लढेंगे? " तेव्हां त्या वीरानें दीनपणाचें भाषण केलें असतां लांछन होय जाणून उत्तर केलें "निषा अखताला बचेंगे तो औरभी लढेंगे " हें ऐकून त्या दुष्टानें पाटील बावांचें शिर छेदून नेलें (भाऊ बखर) या पद्यांत द्वितीय चरणांत मी मारीन असें न ह्मणतां पर्यायानें विस्तार करून तोच अर्थ उत्पन्न केला आहे ह्मणून ओजः नामक गुण झाला आहे " ओजःस्या प्रौढि रर्थस्य संक्षेपोवातिभूयसः[जयदेव] "

६३ काशीक्षेत्र अयोध्येचा नवाब सुजाउद्दौला याचे ताब्यांत होतें तें आपल्या ताब्यांत असावें असें एकदां नानासाहेब पेशव्यांनीं मनांत आणून काशीकडे ससैन्य चाल केली त्या वेळीं सुजाउद्दौल्यास भीति पडून तो ही फौजेसहित काशीमध्यें आला आणि त्यानें तेथील सर्व ब्राह्मणांस ताकीद दिली कीं, " तुमचे ब्राह्मण राजे काशीवर चाल करून आले आहेत त्यांस मागें परतवावें नाहींतर मी तुह्मासर्वांच्या सुंता करून टाकितों " तेव्हां थोर थोर विद्वान ब्राम्हण जमून पेशव्याकडे आले त्यांच्या विनंति वरून पेशव्यांनीं काशी घेण्याचा बेत रहित केला. (पे.बखर)

गीति.

गिलचा भाउस लावुनि सामाचा नाद पानिपतसमरीं ॥
साधून समय बुडवी संधी अनुकूल पाहणें चतुरीं ॥ ६४ ॥

शालिनी.

भाऊचित्तीं वाढला वीर्यगर्व । तद्गर्वानें भेद झाला अपूर्व ॥
भेदें झाला संगरीं नाश थोर ।द्यावा गर्वा स्वल्प चित्तीं न थार ६५

दिंडी

साम गिलच्याशीं करुनि दे तसें मी । सुजाची ही ऐकून थाप नामी ॥
भुलुनि गेला बुडुनियां ठार भाऊ । शत्रु-वचनीं विश्वास नये ठेवूं ६६

---

६४ अबदल्ली तह करण्याच्या नादाला भाऊसाहेबास लावून मराठयांच्या फौजेंत दुष्काळाचा कहर होण्याची वाटच पाहत होता. तितक्या पल्लयावर गोष्ट आल्यावर त्यानें तहाचें आखडतें घेतलें. भाऊसाहेबांस आपणास अनुकूल असा तह होईल अशी आशा होती. पण व्यर्थ. एवढा धोरणी व मुत्सदी भाऊसाहेब पण पुण्याहून मदत मागावयाची नाहीं अशा अभिमानास पडल्या मुळें ही मोठी चूक त्या कडून झाली. अबदालीनें शहाणपणानें योग्य संधी प्राप्त झाल्यावर तिचा फायदा घेतला. " धीरः समयं प्रतीक्षेत. "

६५ आपण पराक्रमी व शाहणें आहों, शिंदे होळकरांच्या व जाटाच्या मसलती ऐकण्यांत अर्थ नाहीं. असा भाऊस अभिमान झाला होता. त्यानें होळकर जाट इत्यादिकांचा अपमान केला. त्या मुळें जाट तर निघून गेलाच. होळकरानें कसूर केली असें खुद्द माधवरावपेशव्यानेंच बोलून दाखविलें आहे. या प्रमाणें फूट झाली ह्मणून अपयश प्राप्त होऊन मोठा थोरला नाश झाला. या पद्यांत कारणमाला अलंकार आहे.
" गुंफः-कारणमाला स्याद्यदा प्राक्प्रांतकारणैः " चंद्रालोक.
" न वहेद्गर्वं बुधो मनसा. "

६६ तह करण्याच्या कामांत सुजा उद्दौल्याचा विश्वास भाऊंनीं फार धरिला होता. " महामतिरपि प्राज्ञो न विश्वासं व्रजेद्रिपौ. "

द्रुतविलंबित.

पळति पानपतांतुनि जे जन। सुरजमल्ल हि तत्प्रतिपालन ॥
करि ह्मणून सुकीर्ति वरी तया। सतत दीनजनीं करिजे दया ॥ ६७

शा. विक्री.

बल्लालात्मज माधवप्रभु मला भूपाल वाटे खरा।
पाहे ना प्रकृती निजप्रकृतिच्या सौख्यार्थ जो मोहरा ॥
लोकांचा जणुं होय कंठ-मणि तो वीराग्रणी शाहणा।
घ्यावें लोकहितास्तव प्रतिजनें वाहूनियां आपणां ॥ ६८ ॥

शा वि.

" राजाला प्रतिबंध फार करिती तेणें बुडाले रणीं
भाऊ पानपतीं ससैन्य " गणुनी धर्मज्ञ तो धोरणीं।
श्रीमन्माधव दे नृपास सुमति स्वातंत्र्य मोठ्यामनें
लागे ठेंच पदास ती बघुनिया व्हावें शहाणें जनें ॥ ६९ ॥

---

६७ सुरजमल्ल जाटानें या वेळीं अवर्णनीय उपकार केला. त्याची तपशीलवार माहिती भाऊसाहेबांच्या कैफीयतींत आहे ती वाचण्या विषयीं वाचकांस शिफारस करितों. " दुःखिते कुरुदयाम् "

६८ थोरले माधवराव पेशवे यांनीं राज्याच्या वृद्धी करितां व लोक कल्याणा करितां अतिशय मेहनत घेतली. जानोजी भोसल्याची खोड मोडण्यांत तर या राज बिंड्यानें जी दौड केली तींत एकदां मूत्रमार्गानें रक्त ही पडलें. आणि अशा दगदगी मुळेंच माधवराव यास सर्व महाराष्ट्र वैभवास क्षय लावणारा क्षयरोग झाला असें वाटतें. या पद्यांत प्रकृति शब्द दोन वेळ आला आहे त्यांचे अर्थ भिन्न आहेत. आपल्या प्रजेच्या सुखा करितां तो स्वतःच्या शरीरारोग्याकडे पाहत नसे. शब्दसाम्यानें विरोधाभासालंकार आहे. त्यांच्या अर्थभिन्नत्वानें विरोध-परिहार आहे. " आभासत्वे विरोधस्य विरोधाभास इष्यते " चंद्रालोक. तिसऱ्या चरणांत उत्प्रेक्षालंकार आहे माधवरावावर कंठमणीची संभावना केली आहे. "संभावना स्यादुत्प्रेक्षा वस्तु हेतु-फलात्मना. " कुवलयानंद. " परोपकारःपुण्याय. "

६९ साताऱ्च्या राजास प्रतिबंधांत ठेवण्याच्या संबंधांत भाऊसाहेबांचा फार आग्रह होता. तेव्हां हा मोठा अधर्म झाला त्याचेंच प्रायश्चित्त पानपतांत भोगावें लागलें. असें त्या वेळीं वाटणें साहजिकच होतें. त्यांतून माधव-

शालिनी.

आनंदीच्या लागुनी पूर्ण नादा। वादा मांडी म्लेच्छ-सख्येंहि दादा।
राज्यासुद्धां आचवी स्वीयमान। स्वीकारावी स्त्रैणता ती कदा न७०

शा. वि.

देखोनी करवीर राज्य सजला तो पेशवा ध्यावया।
वैतागून निघे जिजाइ चतुरा काशीस ती जावया॥
सोडी माधव तैं स्वनिश्चय तिला दे दत्तका संमति।
लोकांचा अपवाद यो न ह्मणुनी सुज्ञें जपावें अति॥ ७१ ॥

वसंत तिलक.

बापू स्वताहुनि असे बहु बुद्धिमंत।
तेणें स्वतेज न पडे बरवें सभेंत॥
पाहून माधव घरीं बसवी तयातें।
नाका परीस जड ठेवुं नयेच मोतें॥ ७२ ॥

राव हा मोठा धोरणी होता. त्याला पानपतांत गेलेलें वैभव पुन्हा मिळवाव याचें होतें आणि त्या महा-युद्धानंतर तर सर्व सरदारांत फारच फाटाफूट झाली होती. तेव्हां हें सत्कृत्य केलें असतां सर्व मराठ्यांस संतोष होईल ह्मणून विशेषतः त्यानें राजास स्वातंत्र्य दिलें असावें. पूर्वी प्रमाणें स्वातंत्र्य दिल्या बद्दल चिटणीस-कृत रामराजाच्या चरित्रांत लिहिलें आहे. या पद्यांत, " ठेंच लागणें " ही लोकप्रवादानुकृति होय ह्मणून लोकोक्ति अलंकार. व धर्मज्ञ, धोरणी, ही विशेषणें साभिप्राय आहेत ह्मणून परिकरालंकार होय.

७० आनंदी बाई ही रघुनाथरावाची दुसरी बायको. " न स्त्रीजितः प्रमूढःस्यात् गाढरागवशीकृतः "

७१ कोल्हापूरच्या थोरल्या संभाजीच्या मागें त्याची स्त्री जिजाबाई इनें एक मुलगा दत्तक घेतला. पण माधवराव पेशवे तो दत्तक मान्य करीनात. तेव्हां पेशव्यांच्या मनांत हें राज्य खालसा करावें असें आहे. असें जाणून जिजाबाई काशीस जाण्याच्या उद्देशानें पांच चार हजार लोकांसहवर्तमान पुण्यास गेली. तेव्हां आपला दुर्लौकिक होईल अशा भीतीनें पेशव्यानें तिला दत्तकाची मंजुरी दिली. " परापवादाद्भजेद्भीतिम्. "

७२ सखाराम बापूंस घरीं बसविण्याचें कारण या पद्यांत लिहिल्या प्रमाणें सांगतात. परंतु सखारामबापूंचीं फितुरी पत्रें माधवरावांनीं पकडलीं

गीति.

मानी माधवराय हि मानी अरिबुद्धि-राघवा जावें ॥
शरण न रण योजावें गृहकलहाचें न बीज रोवावें ॥ ७३ ॥

उपजाति.

दिवाण दौला घर घे द्विजाचें । तत्कृत्य राज्यास परंतु जाचें ॥
श्री-माधवें दंडय नबाव केला । ठेवूं नये दुर्मति-सेवकाला ॥ ७४ ॥

गीति.

मानी न दुराईला मामा घर घे बळेंच तेल्याचें ॥
परि माधव त्या दंडी स्थान हरावें कधीं न कवणाचें ॥ ७५

त्यावरून त्यांस कारभारांतून काढून प्रतिबंध केला हें विशेष संभवतें. जरी त्यांस घरीं बसविलें होतें, तरी रोज त्यांस बोलावून आणून राज्य कारभारांत त्यांचें मत विचारावें असा परिपाठ पेशव्यानें ठेविला होता. चवथा चरण लोकप्रवादानु-कृति आहे. ह्मणून हा लोकोक्ति अलंकार आहे. " न तेजस्तेजस्वी प्रसृतमपरेषां प्रसहते. "

७३ शके १६८४ मध्यें ही गोष्ट घडली. माधवराव व राघोबा यांची लढाई होण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं माधवराव शहाणपणानें राघोबास शरण गेला. (पंत—प्रधान यांचीशकावलि) " कलहांतानि हर्म्याणि. "

७४ नवाबाच्याराज्यांत रुक्मतदौला नामें दिवाण होता. त्यानें आपल्या हवेली नजीक एका ब्राह्मणाचें घर होतें ते बळजबरीनें घेतलें. तेव्हां ब्राह्मण माधवराव पेशव्याकडे फिर्यादीस गेला. पेशव्यांनीं वकिला मार्फत नवाबाकडे ब्राम्हणाचें घर देण्याबद्दल कित्येक सूचना केल्या तथापि दिवाणानें त्या मधेंच दाबून ठेविल्या. तेव्हां पेशव्यांनीं नबाबाच्या राज्यावर स्वारी केली. त्या वेळीं नवाबास सर्व हकीकत समजली. तेव्हां त्यानें ब्राम्हणाची जागा त्यास परत देवविली. व पुढें कधींहि ब्राम्हणास उपद्रव देणार नाहीं, अशी कुराणाची शपथ दिली. [पे. बखर.] " भृत्यदोषाद्धतःप्रभुः "

७५ त्रिंबकरावमामा पेठे हे सदाशिवराव भाऊंचे मामा. थोरले माधवराव लहान होते तेव्हां मामांच्या हातीं कारभार होता. त्यांनीं आपल्या घरा समीप एका तेल्याचें घर होतें तें जबरीनें घेऊन आपल्या घरांत सामी-

गीति.

विठ्ठल शिवदेव मिळे दादाला ह्मणुनि दंड त्या युक्त ॥
माधव-कृपा करी परि व्हावें गुणि सेवकीं क्षमायुक्त ॥ ७६ ॥
वेळीनें निजकार्या प्रजाजनांतें विसाजि तो लावी ॥
पावे शासन ह्मणुनी प्रभुची आज्ञा कदा न मोडावी ॥ ७७ ॥

ल केलें त्या वेळीं तेल्यानें माधवरावाची दुराई घातली. पण ती मामांनीं जुमानिली नाहीं. तेव्हां तेली शंख करीत पेशव्याकडे फिर्यादीस गेला, व ह्मणाला कीं, मामांनीं आपली दुराई न जुमानितां माझें घर घेतलें. मामांच्या मनांत माझें घर घ्यावयाचें पूर्वीं पासून होतें. पण नानासाहेबांच्या कारकीर्दींत त्यांचें चाललें नाहीं. आतां आपण लहान निर्बल पाहून मामांनीं घर घेतलें. हें ऐकून माधवरावास फार क्रोध आला. पण मामा सारख्या वजनदार मनुष्यास कसें दुखवावें याचा त्यांस थोडा विचार पडला. तेव्हां तेल्याचें घर तेल्यास मिळाल्या घांचून अन्नग्रहणच करणार नाहीं. अशी शपथ घेऊन ते देवघरांत बसले. कांहीं वेळानें मामा आले तेव्हां शागीर्दानें सांगितलें कीं, श्रीमंत अजून जेवले नाहींत. हें ऐकून मामा ह्मणाले, अलीकडचीं हीं श्रीमंतांचीं पोरें भारी हट्टी आहेत. हें ऐकतांच माधवरावास राग आवेरनासा झाला. त्यानें उठून मामांच्या श्रीमुखांत लगाविली व आतांच्या आतांच तेल्यास त्याचें घर मिळालें पाहिजे असें ह्मटलें. तेव्हां लागलेंच तेल्यास त्याचें घर मिळालें. (ही गोष्ट करवीर इलाख्यांतील प्रसिद्ध पोवाडे संग्रहकार रा. रा. गोविंद बल्लाल शितत यांच्या संग्रहांत असलेली आम्ही वाचली आहे.) " कस्याचित्किमपिनो हरणीयम् "

७६ विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे दादासाहेबांच्या लक्षानें वागले होते ह्मणून त्यांवर माधवरावाचा राग होता. एकदां कांहीं निमित्त उपस्थित होऊन त्यांचा गोट लुटण्या विषयीं माधवरावानें फौजेस हुकूम केला. तेव्हां विंचूरकर मोठया वीरश्रीनें लढाईस तयार झाले. त्या वेळीं सुभेदार होळकरांनीं मध्यस्थी करून " शूरास लढाईवर मारावें " असें सांगून हल्ला राहविला. पुढें हैदराबरोबरच्या लढाईंत विंचूरकरानें मोठा पराक्रम केला, तेव्हां त्याच्या अपराधाची क्षमा करून माधवराव त्यावर लोभ करूं लागले. (विंचूर करांची यादी.) " क्षमिणा पुरुषेण भवितव्यं "

७७ विसाजी केशव लेले मामलेदार वसई हे माधवरावाच्या कृपें

शस्त्रव्यथितहि दादा होउनि सुस्नात ते समर-महिंत ॥
पार्थिव पूजन करिती स्वकर्म सोडूंनये कदा विहित ॥ ७८ ॥

स्रग्धरा.

मोत्याच्या चौकड्याची हृदयिं धरुनियां आस शागीर्द रामा।
जाई काशीस, विद्या करि, पदजडवी थोर " शास्त्री " स्वनामा।
न्यायाधीशत्व लाभे धवलि परभुणे वंश तो सद्यशानें।
विद्याकल्पद्रुमाला वय नच गणुनी मेळवीजे नरानें ॥ ७९ ॥

गीति.

ऋण होय पेशवाइस जाचे तें फार अंतकाळीं ही ॥
श्रीमन्माधवराया, ऋण सर्पा पाळिजे नरें न गृहीं ॥ ८० ॥

तींल होते. परंतु वेठीस लोक धरूं नयेत हा माधवरावांचा हुकूम तोडल्या-बद्दल त्यांस शिक्षा झाली.

७८ रोज सायंकाळीं पार्थिव पूजन करण्याचा दादासाहेबांचा नियम असे. राक्षस भुवनच्या लढाईंत त्यांस जखम झाली होती तरी त्यांनीं स्नान करून पूजेचा नियम चुकविला नाहीं. [हरिवंशांची बखर.] " श्रुतिस्मृत्युक्तमाचारं न त्यजेत्साधुसेवितम् "

७९ रामशास्त्री परभुणे हे पूर्वी एका सावकाराचे येथें शागीर्द होते. एके दिवशीं यजमानांच्या पायांवर पाणी घालीत असतां रामाचें लक्ष्य सदरेवर सौदागिरांनीं मोत्याचे चौकडे आणिले होते त्यांची परीक्षा चालली होती, तिकडे गेलें. ह्मणून पाणी पायांवर न पडतां मोरींत पडूं लागलें. ते व्हां यजमान ह्मणाले " अरे तुझें लक्ष कोणीकडे आहे? " रामा ह्मणाला, " महाराज त्या चौकड्यांकडे, तसला चौकडा मीं घालावा असें मला वाटतें. " यजमान हंसून ह्मणाले " अरे चौकडा सभाविजयि-पंडितास अगर समर विजयिवीरासच शोभतो. " रामा ह्मणाला " तर मग मी पंडित होतों. " त्याची उत्कट इच्छा पाहून सावकारानें त्यास काशीस विद्याभ्यासार्थ पाठविलें. तेथें पंडित होऊन, अग्रपूजा मिळवून, रामशास्त्री होऊन, हे पुण्यास आले. तेथें पेशव्यांनीं त्यांस मुख्य न्यायाधीशाची जागा दिली. [हिं. कथारस.] " गतेपि वयसि ग्राह्या विद्या सर्वात्मना बुधैः "

८० " लोकेषु निर्धनो दुःखी ऋणग्रस्तस्ततोधिकं " "ससर्पे च गृहे वासो मृत्युरेव न संशयः "

वसंत तिलक.

“ वाड्यांतुनी नगरपार असे मुधार ।
नेतों ” टिळेकर वदे नच घे विचार ॥
नारायण स्वमनिं भी मग नाश पावे ।
स्वप्राण संकटिं न भें कसलें धरावें ॥ ८१ ॥
“ याचा विचार करुं भोजन सारुनीयां ।
तात्या असें वदति ” घातचि मानुनीयां ॥
हा! हा! सुमेर सहसा वधि पेशव्यातें ।
आतांच होय करिजे अवधी न त्यातें ॥ ८२ ॥

स्त्रग्धरा.

नारोजी स्पष्ट बोले “ धवल निजयशें पेशवे वंश केला ” ।
दादा साहेब नेत्रां फिरविति तंव तो स्वर्गपंथास गेला ॥
बोले तो रामशास्त्री तंव निमुट बसे तोच कीं दीनभावें ।
आंगीं सत्तेज नाहीं तरि चतुर नरें स्पष्टवक्ते न व्हावें ॥ ८३ ॥

---

८१ ही गोष्ट नारायणराव पेशव्याच्या बखरींत आहे. या पद्यांत पावे हें क्रियापद भी (भय) आणि नाश या दोन्ही कडे लागतें ह्मणून येथें क्रियादीपक अलंकार झाला. जेथें एकाच पदाचा संबंध अनेक वाक्यांत राहतो तेथें दीपक अलंकार होतो. “ जाति क्रिया गुणद्रव्यवाचिनैकत्र वर्तिना सर्ववाक्योपचारश्चेत्तमाहुर्दीपकंबुधाः ” “ तावद्भयाद्धि भेतव्यं यावद्भयमनागतम् आगतंतुभयं वीक्ष्य प्रहर्तव्यम अभीतवत् ”

८२ आपल्या विरुद्ध गारद्यांत कांहीं कट झाला आहे असें अगोदर सकाळींच नारायणरावास कळलें होतें. त्यांनीं हरीपंत फडक्यास विचारिलें. हरीपंत तात्या ह्मणाले “ जेवणा नंतर याचा पुरता तलास लावूं ” हें बोलणें तुक्या पवार हुजऱ्या जवळ होता त्यानें ऐकिलें. त्यानें ताबडतोब सुमेरासिंगास कळविलें. कीं आतांच घाई केली पाहिजे नाहींतर मरतों. ह्मणून गारद्यांनीं लागलीच वाड्यांत जाऊन पेशव्यास मारिलें. “ न कश्चिदपि जानाति किं कस्य श्वो भविष्याति अतःश्वःकरणीयानि कुर्यादद्यैव बुद्धिमान् ”

८३ नारोजी हा एक जासूद होता. त्यानें स्पष्टवक्तेपणा करून रघुनाथरावास वरील भाषण केलें. पण रघुनाथरावानें गारद्यांस खूण करून त्याचें तत्काल डोकें उडविलें. तोच रघुनाथराव जेव्हां रामशास्त्र्यांनीं तुह्मा

पृथ्वी.

" प्रभुत्व मिरवाल या पुरिं न तोंवरी मी वसें " ।
स्वबंधुसुत घातका वदुनि राघवाला असें ॥
पुणें त्यजुनि जाय तो सुजन रामशास्त्री क्षणें ।
नये करूं सुदुर्जना निकट सज्जनें राहणें ॥ ८४ ॥

गीति.

पुतण्याचा घात करी राज्यश्री सून तीहि बळकावी ॥
निष्प्रभ राघव होई विषवल्ली निंद्यकृति न लव खावी ॥ ८५

शा वि.

" नोहे मान्य तरी तुह्मी न वदलां म्यांही नसे ऐकिलें " ।
बापू पासुनि आण घेउनि अशी पेंचांत त्या पाडिलें ॥
मामांनीं स्वमतानुकूल अरि ही केला सुधीरव्रतें ।
कीजे अद्भुत योजुनी चतुरता दुःसाध्य ही साध्य तें ॥ ८६ ॥

स देहांत प्रायश्चित्त पाहिजे असें ह्मटलें त्या वेळीं दीनासारखा गप्प बसला. त्या महातेजस्वी शास्त्र्यापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं.

८४ या पद्यांत स्वबंधुसुत–घातका हें विशेषण साभिप्राय आहे. ह्मणून येथें परिकरालंकार होय. " अलंकारः परिकरः साभिप्राये विशेषणे। सुधांशुकलितोत्तंसस्तापंहरतुवःशिवः " (कु. नंद.) नस्थातव्यं न गंतव्यं दुर्जनेन समं क्वचित् "

८५ नारायणराव हा रघुनाथरावाचा पुतण्या त्याचा त्यानें घात केला व नारायणरावाची राज्यश्री ही स्त्री होय. तेव्हां ती रघुनाथरावाची अर्थात् सून झाली. तेव्हां ही त्याची कृति अर्थात् अधर्माची झाली. निंद्य कृति आणि विषवल्ली यांचा अभेद आहे ह्मणून रूपकालंकार. " न कुत्सितं कर्म कुर्वीत "

८६ नारायणराव पेशवे मारले गेल्या नंतर नानाफडणीस, त्रिंबकरावमामा, हरीपंत फडके इत्यादि अकरा जणांनीं गंगाबाईच्या नांवानें कारभार चालवावा, राघोबास अटकेंत ठेवावें, या कामास निजामाचें साहाय्य घ्यावें असा कट केला, व ज्यागोष्टी ठरल्या त्यांची यादी करून त्यावर सर्वांनी सह्या कराव्या असें ठरलें. पण प्रथमतःनाना सही करीनात. ते ह्मणाले, या कटांत सखाराम बापू नाहींत, तो एकशाहणा तो राघोबा कडील आहे पण

उपजाति.

दावी सदोबा सकळांस नाना । भाऊ असें कोणहि ओळखेना ॥
तेव्हां यमाचें गृह त्यास दावी । क्रिया न केव्हां सहसा करावी८७

बापू शिवाय आमचें हें राजकारण सिद्ध व्हावयाचें नाहीं. ते येतात कसे?" त्यावेळीं बापूंस वश करून घेण्याचें दुर्घट काम मामांनीं आंगावर घेतलें. आणि बापूंचा व त्यांचा द्वेष असतां ही ते बापूंच्या घरीं गेले. हें पाहून बापू साश्चर्य होऊन त्यांस ह्मणतात " मामा आज सूर्य पश्चिमेस कसा उगवला? " मामा ह्मणाले. " केव्हां केव्हां उगवतो. एकांतीं बोलावयाचें आहे. मुंगीचा ही शिरकाव असूं नये. " तेव्हां बापूंनीं त्यांस एका खोलींत नेलें, मग मामा ह्मणाले, " आधीं ' बोलेन तें माफ ' असें वचन असावें " तें वचन बापूंनीं दिलें मग मामा म्हणाले " मी आपणास आतां कांहीं सांगणार आहे. तें तुम्हांस मान्य झालें तर ठीकच नाहीं तर मी बोललों नाहीं व तुम्ही ही ऐकिलें नाहीं असें मानावें असें दुसरें वचन पाहिजे. " ही सरळ गोष्ट आहे असें बापूंस वाटलें. यांत मामांची काय खुबी आहे तें त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं. त्यांनीं तसें वचन दिलें. तेव्हां मग मामानीं कारस्थानाची सर्व हकीकत सांगितली व तुम्ही आमच्या कटांत या असें म्हटलें. तेव्हां बापूम्हणालें " मामा मी तिकडे मिळेन हें कसें घडेल? " मामा म्हणाले ठीक आहे. मी जातों. पण मी बोललों नाहीं व आपण ऐकिलें नाहीं हें आपलें वचन आहे. याचें मात्र बेवचन होऊन अपकीर्ति होईल. हे ध्यानांत असावें. एक बापू नसले म्हणजे आमचें थोडेंच अडणार आहे." हें ऐकून मग बापूंच्या ध्यानांत पेंच आला की, हें कारस्थान ज्या अर्थी आपणास आतां समजलें. त्या अर्थी हें ऐकिलेंच नाहीं असें मानणें अशक्य आहे. या प्रमाणें त्या कटांत सामील झाल्याविना बापूंस दुसरी गति उरलीच नाहीं,

८७ तोतया सदाशिवरावभाऊ खरा कीं खोटा या बद्दल नानाफडणिसांनीं चांगली चौकशी केली. नव्हे असें ठरल्यावर त्यास हत्तीच्या पायांशीं दिलें, " सहसा विदधीत नक्रियां " .

साकी.

नवाब बोले " या हुजऱ्याहुनि काय पेशवा छोटा " ? ।
काळे वदले " असे आपणांहुनि हि दूर्यंगुळ मोठा " ॥
समया उचित चि जें ॥ भाषण बोलावें मनुजें ॥ ८८ ॥

शा. वि.

नानाशीं मम मित्रता भय मला नाहींच पृथ्वीमधीं ।
घाशीराम असें गणून हृदयीं तेलंगविप्रां वधी ॥
पावे तो द्विजसंघकोपदहनें तत्काल कीं भस्मता ।
सेवावी महदाश्रयें फुगुनियां कोणीं न उन्मत्तता ॥ ८९ ॥

वसंततिलक.

जो नाटकांत फडणीस सवाइ यांचें ।
आणून सोंग वदला अतिनिंद्य वाचे ॥
तो सोंग आपणच होय मशीर साचा ।
कीजे कधीं न अपमान महाजनांचा ॥ ९० ॥

---

८८ हैदराबादचे नबाव व गोविंदराव काळे पेशव्याकडील नबाबा कडे वकील होते त यांचीं वरील प्रश्नोत्तरें होत. [लोकहितवादी कृत ऐतिहासिक गोष्टी.] " अवसर--पठिता वाणी गुण--गण--रहितापि शोभते पुंसाम् "

८९ पुण्याचा कोतवाल घाशीराम यानें कित्येक तेलंग ब्राह्मण एका कोठडींत अडकवून ब्लॅक होलच केलें. घाशीराम हा नानाफडणिसांच्या कृपेंतील होता. मानाजी फाकड्यानें त्या तेलंगांपैकीं एक दोन जिवंत होते त्यांस खोलींतून बाहेर काढून सरकार वाड्यांत नेलें. तेथें हजारो ब्राम्हण जमले. पुढें श्री० सवाई माधवरावांनीं स्वतःचौकशी करून घाशीराम अपराधी ठरल्यावर त्यास ब्राह्मणांच्या स्वाधीन केलें. ब्राह्मणांनीं दगडांनीं त्याचा कपाळ मोक्ष केला.

९० मशीरउलमुलख हैदराबादचा दिवाण यानें श्रीमंत व फडणीस यांचीं सोंगें तमाशांत आणविलीं. त्यावेळीं काळे हे पेशव्यांचे वकील तेथें होते त्यांनीं सांगितलें कीं आमच्या यजमानांचीं सोंगें आणिलीं त्या अर्थीं दिवाणास पुण्यांत दारोदार हिंडवूं तरच नांवचे काळे होऊं. पुढें खंडणीच्या बाकी बद्दल बोलणें चाललें असतां. तुमच्या नानाफडणिसालाच येथें आणिलें पाहिजे त्याशिवाय हिशेब उलगडत नाहीं. पेशव्यांस व नानांस हातांत

तोटक.

खर्डे समरीं यवना रगडी । पटवर्धन भाउ सुवीर गडी ॥
धवली यश साजवि जें । तरवार रणावर गाजविजे ॥९१

गीति.

दे स्मरण भार्गवाचें रणकर्कश परशुराम तो धांवे ॥
भूपा दुर्गीं कोंडी धुरंधरालाच कार्य सांगावें ॥ ९२ ॥

शा. वि.

" आह्मी तों उपकारबद्ध वसतों घेऊं न कांहीं धन ।
पेंढाऱ्यांस निवारितों निजबलें " आंग्लोक्त हें ऐकुन ॥
मानी योग्य न तें रिपूस निवटी मानी रघोजी स्वता ।
कीजे सत्य निजावलंबन नरें धिक् ती पराधीनता ॥ ९३ ॥

तुंबा देऊन काशीस पाठविलें पाहिजे इत्यादि निंद्य भाषणें दिवाणानें केलीं. यामुळे पुढें खर्ड्याचें महायुद्ध होऊन मशीरास धरून पुण्यास अटकेंत ठेविले होते. " न महांतं क्वापि गर्हेत ".

९१ परशुराम भाऊ हे खर्ड्याच्या स्वारींत मुख्य सेनापति होते. " विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा सदसि वाक्पटुता युधि विक्रमः । यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ प्रकृतिसिद्धमिदंहि महात्मनाम् ".

९२ साताऱ्चे राजे किल्याखालीं येऊन अमल बसवूं लागले तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्यास प्रथम रास्त्यांस सांगितलें होतें पण रास्ते पराभूत झाले. शेवटीं बाजीरावानें परशुराम भाऊंची योजना केली तेव्हां भाऊंनीं राजास किल्ल्यांत पूर्वी प्रमाणें बंदोबस्तांत ठेविलें. " धुर्यः कार्ये नियोक्तव्यः "

९३ सन १८०३ च्या सुमारास नागपूर प्रांतावर अमीरखान पेंढाऱ्यानें स्वारीकेली पेंढाऱ्यांचें निवारण करण्याचें सामर्थ्य नागपूरचे रघोजीभोसले यांचें आंगीं तादृश नव्हतें त्यावेळीं इंग्रेजांनीं जेंकिन्स साहेब रेसिडेंटामार्फत भोंसल्यास कळविलें कीं, " आह्मी दोन तीन पलटणें पाठवून पेंढाऱ्यांचें निवारण करितों या बद्दल खर्च तुमच्या जवळ मागत नाहीं आमच्यावर भोंसल्यांचे बहुत उपकार झाले आहेत तेव्हां आपल्या उपयोगी पडण्याची ही संधि आह्मास द्यावी " त्यावेळीं रघोजी ह्मणाला " आजपर्यंत मी आपल्या हातानें जेवीत आलों, आतां दुसऱ्याच्या हातानें जेवण्याचा प्रसंग आला. " त्यानें मोठ्या कष्टानें निरुपाय जाणून इंग्रेजांच्या बोलण्यास अनुमो

गीति.

गतपद वाजीसह करि गतपद फडणीस सख्य चतुर-वर ॥
होई कृत-कार्य असा मित्र करावा समान-दुःख नर ॥ ९४ ॥

तोटक.

अमृतोपम बाजि दुजा वदुनी । फडणीस-मना-प्रति तोषवुनी ॥
निजमंत्रिवर व्यसनांत करी । मधुरोक्ति सदा वदणें चतुरीं ॥ ९५

मंदाक्रांता.

" स्वद्वेरीचा कधिं न परिसों नाद बेटावरी ही '
नानाचा तो श्रवणपथिं ये आंग्लभूमींत पाहीं " ॥
हें आंग्लोक्त श्रवण करुनी भाउ लज्जेस पावे ।
संपादावें यश नच कदा थाटमाटा भुलावें ॥ ९६ ॥

दन दिलें. पण आपल्या सेनापतीस असा हुकूम पाठविला कीं, " इंग्रजांचीं पलटणें यावया पूर्वीं तुह्मी पेंढाऱ्यांचें पारिपत्य कराल तरच तुह्मास आमचें दर्शन होईल " या निरोपा प्रमाणें पलटणें येण्यापूर्वींच पेंढाऱ्यांचा पराभव झाला. (नागपूर-कराची वखर.) " यद्यदात्मवशं तु स्यात्तत्तत्सेवेत यत्नतः येपराधीनतां यातास्ते वै जीवंतिकं मृताः"

९४ चिमाजी आप्पा पेशवाईच्या गादीवर होते त्यावेळीं बाजीराव शिंद्या च्या अटकेंत होता. पेशव्यांचे कारभारी त्यावेळीं परशरामभाऊ होते व नानाफडणीस हे शिंद्याच्या भयानें कोंकणांत पळून गेले होते. त्यांनीं मोठें राजकारण करून बाजीरावाशीं सख्य करून शिंद्यास वश करून बाजीरावास पेशवाई दिली व आपण कारभारी झाले. " समानदुःखःसखा कार्यः ".

९५ नानाफडणिसांनीं कैदेंतून सुटून आल्यावर आतां घरीं स्वस्थ बसावयाचें, कारभार करावयाचा नाहीं असा बेत केला. पण बाजीरावास त्यावेळीं नाना कारभारी झाले पाहिजे होते. त्याशिवाय तो मोठ्या संकटांत होता तें संकट निवारण व्हावयाचें नव्हतें. ह्मणून त्यानें आर्जव करून, गोड भाषणें बोलून त्यांची मर्जी प्रसन्न करून घेतली. आणि त्यांस मुख्य कारभारी केलें. " प्रिय-वाक्य-प्रदानेन सर्वे तुष्यंति जंतवः तस्मात्तदेव वक्तव्यं वचने का दरिद्रता "

९६ पेशवाईचे अखेरीस सदाशिवरावभाऊ माणकेश्वर हे कारभारी होते. त्यांस पेशव्यांनीं डंका दिला होता. एकेदिवशीं एलफिन्स्टन साहेबां-

गीति.

गंगाधर शास्त्र्याचा नच राज्याचाच घात करि थोर ॥
रघुनाथ–पुत्र बाजी कर्म करावें कदापि नच घोर ॥ ९७ ॥

शा. वि.

" वर्षें दोन तरी सुशिक्षित निजा सेनेस आधीं करा ।
स्वारी नंतर इंग्रजांवर " कथी हा मंत्र काळे बरा ॥
बाजी तो न गणी पराजय वरी राज्या मुके शेवटीं ।
बर्तावें उपदेश वृद्ध कथिती ठेवून तो हृत्पटीं ॥ ९८ ॥

बरोबर भाऊ बोलत बसले असतां ह्मणाले " श्रीमंतांनीं आह्मास डंक्यांचा मान दिला आहे. हा मान नानाफडणिसास ही नव्हता. तेव्हां तो चतुर वकील म्हणाला " पण भाऊसाहेब आह्मास आपला डंका याबेटावर [पुण्याजवळ बेटांत इंग्रेज वकीलाचा बंगला होता त्याठिकाणास बेट ह्मणत.] ही कधीं ऐकूं येत नाहीं. नानांचा डंका आह्मीं विलायतेंत ही ऐकत होतों " हें ऐकून सदाशिवराव अर्थात् चूप बसले. निबंधमाला " अक्षराणि परीक्ष्यंतामंबराडंबरेण किम् ".

९७ गंगाधरशास्त्री हे गायकवाडांच्या मार्फत पेशव्यांकडे वकील आले होते. त्यांचा खून त्रिंबकजीडेंगळ्यानें करविला. या कामास बाजीरावाची संमति असावी असा इंग्रेजांस संशय आला. तेव्हां पासून इंग्रजांचें व श्रीमंतांचें वांकडे पडलें. या पद्यांत अपन्हुति नामक अलंकार आहे. शास्त्र्याचा घात केला नाहीं तर राज्याचाच केला. या ह्मणण्यांत शास्त्र्याच्या घाताचा निन्हव करून राज्य घाताचा त्याठिकाणीं आरोप केला आहे. " शुद्धापन्हुतिरन्यस्यारोपार्थो धर्म–निन्हवः नायं सुधांशुः किं तर्हि व्योमगंगासरोरुहं ".

९८ गोविंदराव काळे हे जुन्यापैकीं अक्कलवान् त्यांस मुद्दाम मसलत विचारण्याकरितां पेशव्यांनीं बोलावून आणिलें. त्यांनीं वरील उपदेश केला होता (पे० बखर.) " हितोपदेशं श्रुणुयात्कुर्वीतच यथोदितम् "

साकी.

कोणी बापू लागीं वदला " त्वत्सम वीर न तोले " ॥
" पटवर्धनवर आप्पां पुढतीं तुच्छ असों हा बोले ॥
मी-पण सोडावें । मनुजें परगुण वर्णावे ॥ ९९ ॥

पृथ्वी.

विरोध पटवर्धन प्रतिनिधीसवें चालवी ।
धन्यासहि विमर्दुनि स्वपदभक्ति तो मालवी ॥
सुटून घर धीरही समयिं राव बाजी भ्रमे ।
स्वकीयजनमानसा विटविजे न भव्य-भ्रमें ॥ १०० ॥

श्रीगणपति पद कमलीं अर्पितसें काव्यहें मनो-भावें ॥
तद्वंधें तरि विलसो प्रभुशक्तीनें सदा सुशोभावें ॥ १०१ ॥

समाप्त.

---

९९ बापूगोखल्यांस कोणीं ह्मटलें कीं, "तुमच्या जोडीचा वीर सांप्रत नाहीं." तेव्हां त्या निरभिमानी पुरुषानें उत्तर केलें " हा मान रामचंद्रपंत आप्पासाहेब पटवर्धन यांस योग्य आहे." (परशु. चारित्र.) " परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यं निजहृदि विकसंतः सांति संतः कियन्तः " " निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति."

१०० बाजीराव पेशवे शेवटचे यांनीं शिंदे, होळकर, भोसले इत्यादि सरदारां बरोबर इंग्रजांच्या मदतीनें लढायाच केल्या. पटवर्धन प्रतिनिधि इत्यादिकांच्या जहागिरी जप्त करण्याचा त्यांचा मानस होता व कित्येकांच्या केल्याही. या मुळें व सरदारांवर त्यांचा बिलकूल विश्वास नसे या मुळें कित्येक सरदारांनीं त्यास साहाय्य केलें नाहीं. व कित्येकांनीं हा आपल्या मसलतीनें वागत नाहीं आणि सर्वांचाच नाश होणार असें पाहून त्याचा नाद सोडिला. त्यानें मात्र भ्रामिष्टा प्रमाणें सहायाच्या आशेनें सर्व महाराष्ट्रभर भ्रमण केलें. अखेरीस मालकम साहेबांच्या चरणीं सर्व राज्य अर्पण करून हरिहरि करीत स्वस्थ ब्रह्मावर्त येथें राहिला. पूर्वी पेशवे स्वतः भारी फौज बाळगत असत. कार्यांचा आरंभ केवळ सरदारांच्याच आशेवर करीत नसत. पण बाजीरावानें बहुतेक हुजरातीची फौज कमी केली होती. या प्रमाणें तो स्वतः सामर्थ्यहीन होऊन बसला होता.

अंगना–स्त्री.
अंगीकृत–स्वीकारलेलें.
अनयपथग–अन्यायाच्यामार्गानेंजाणा-रा
अन्वर्थनाम–अर्थास अनुसरून नांव ज्याचें असा.
अभिधान–नांव.
अभिलाष–इच्छा, लोभ.
अलि–भुंगा.
अलमगीर–औरंगजेब बादशहानें धारण केलेला किताब.
अवधि–उशीर, वेळ,
आंग्लोक्त–इंग्रेजाचें भाषण.
आंचवीं–सोडूनदेई, त्यागकरी.
आण-शपथ, वचन.
आस–इच्छा, आशा.
औरंगें–औरंगजेबानें.
इंद्रियज–इंद्रियांपासून उत्पन्न होतें तें ज्ञान.
उक्ति–भाषण.
कंठमणि–गळ्यांतील ताईत.
कामद–इच्छा देणारा–पूर्णकरणारा.
कारावास–कारा बंदीखाना, तुरंग; बास–राहणें, बंदीखान्यांत राहणें.
कावा–दुष्टहेतु.
कुभूमिपाल–कु–वाईट, भूमिपाल–राजा, वाईटराजा.
कृतकृत्य, कृतकार्य–ज्यानें कामगिरी केली तो.
क्षमापति–क्षमा [पृथ्वी], पति [स्वामी] राजा, ज्याचा आंगीं क्षमा आहे तो
गुरु–मोठें, सद्गुरु, शिक्षक, वडील मनुष्य, पिता.
गुरुपदाख्य–गुरु या नांवाचें.
जगज्जेता–जग जिंकणारा.
जेठी–पैलवान.
जोहार–वंदन करण्याचा प्रकार. हल्लीं अंत्यज करितात.
तपतां–तपश्चर्या करून.
तुरग–घोडा.
तूर्ण–लवकर.
त्राण–रक्षण.
थार–आश्रय.
दहन–अग्नि.
धनी–धन ज्याचें जवळ तो किंवा आपला स्वामी.
धर–आश्रय, आधार.
धवलीं–धवल (शुभ्र) करी.
धिक्–तिरस्कार वाचक अव्यय.
धुर्य–धुरंधर.
भरी–पोवितो.
भव्य–कल्याण.
भृत्य–सेवक.
भें–भय.
भेरि–दुंदुभि, डंका.
भ्रम–फिरणें, भ्रांति.
मद–गर्व.
मधु–दारू
मानी–मान ज्यास आहे, समजे.
मिष–सोंग.
महदाश्रय–मोठ्यांचा आधार.

मंत्री—मंत्र ह्मणजे मसलत, ती करणारा मुत्सद्दी, प्रधान.
मोहरा—श्रेष्ठपुरुष, बुद्धिबळांतील.
म्लेच्छेश—म्लेच्छ [मुसलमान], त्यां चा राजा.
मृगयार्थ—शिकारी करितां.
यवनपकरीं-यवनांच्याराजाच्या हातांत
यमालय-काळाचें (मृत्यूचें) गृह.
यो—येवो.
रणकर्कश—रणांत पराक्रम करणारा.
रत—तल्लीन, रममाण झालेला.
रति—प्रेम
रती—थोडी.
रुचिर—सुंदर.
राजरत्न—राजांत श्रेष्ठ.
वच—भाषण.
वार—आघात.
विक्रम—पराक्रम.
विपत्सागरतरी—विपत्तिरूपसमुद्रांतील नौका.
विमर्दुनी—मर्दन करून, नाश करून
विलसद्गुणें—ज्याचे गुण शोभतात अशानें.
विहित—चांगलें.
विरेस—ईर्ष्येस. बुद्धिबळांत राजास शह लागला तर मधें एकादें मोहरें घालणें.
वार्ताहर—जासूद, चार.
वीर्यवत्या—वीर्यवती (शूर स्त्री) शद्वाचें अनेक वचन.
व्रत—नियम, ब्रीद.
व्यसन—संकट.
शासन—शिक्षा [प्राकृतार्थ.]
शिबिका—पालखी.
शिव—शिवाजी, कल्याण.
शिवांतर—शिवाजीचें मन.
शिवाजीपंचास्यप्रखरनखभिन्नोदर—शिवाजी रूप सिंहाच्या तीक्ष्ण नखांनीं पोट फाटलेला.
श्रवणा—कानांस.
सजे—तयारहोई.
संगर—युद्ध.
संघ—समूह.
संधि—तह.
समर—युद्ध.
सराग—प्रेमासह.
सांडी—त्यागकरी.
साम—तह.
सार्थ—अर्थासह.
सुकृत—पुण्य.
सुधा—अमृत.
सुरद्रुम—देवांचावृक्ष [कल्पवृक्ष].
सुस्नात—उत्तमप्रकारें स्नान केलेला.
सैन्यपालपद—सेनापतीचा अधिकार.
स्त्रैणता—स्त्रीलंपटपणा.
स्पर्श—शिवणें, परीस नांवाचें रत्न.
स्वयशोर्थ—आपल्या यशासाठीं.
हृतपद—ज्याचें पद हरण केलें असा. पदच्युत.

D/24